बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.२१जुलै २०२४ | वर्षे३रे | अंक३५७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## योजनांची प्रभावी अंमलबजावणी

औरंगाबादः मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजना आदींसह विविध योजनांचा विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज आढावा घेतला. केंद्र व राज्य शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची संबंधित शासकीय विभागांनी प्रभावी अंमलबजावणी करुन पात्र लाभार्थ्यांना विहित वेळेत लाभ मिळवून द्यावेत, असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त यांनी विविध योजनांचा आढावा घेतला.



# आरक्षण थिनगी..!

अखेर बांगलादेशमध्ये संचारबंदी लागू

### आंदोलकांची मागणी काय?

बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांमध्ये ५६ टक्के आरक्षण आहे. यातील सर्वाधिक ३० टक्के आरक्षण हे १९७१च्या स्वातंत्र्यात योगदान देणाऱ्या 'मुक्तिवाहिनी' आंदोलकांच्या वारसदारांना देण्यात आले आहे. नोकऱ्यांमधील आरक्षण हटविण्याची आंदोलक मागणी करीत आहेत. तर सध्या हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने तेथील निकालाची प्रतीक्षा करावी, असे शेख हसिना यांच्या सरकारचे म्हणणे आहे.

- आरक्षण विरोधी आंदोलनात १०५ बळी
- ४०५ भारतीय विद्यार्थी मायदेशी परतले
- राजधानीच्या अनेक भागांत जाळपोळ,तोडफोड

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण रद्द करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाने हिंसक वळण घेतले. त्यानंतर देशभर पसरलेल्या या आंदोलनात आतापर्यंत १०५ जणांचा बळी गेला आहे. हिंसेवर प्रतिबंध आणण्यासाठी आता देशभरात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. बांगलादेशमध्ये १५००० भारतीय नागरिक असून त्यापैकी ८,५०० विद्यार्थी आहेत, अशी माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी दिली. हे सर्व लोक सुखरूप असल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या ४०५ विद्यार्थ्यांना बांगलादेशमधून बाहेर काढले गेले आहे.बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी पुन्हा एकदा सत्तेची सूत्र हाती घेतल्यानंतर देशात अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये सध्या जे आरक्षण धोरण आहे, ते बदलण्याची आंदोलकांची मागणी आहे. बांगलादेशमधील वृत्तवाहिनीवर देशाला संबोधित करत असताना पंतप्रधान शेख हसीना यांनी आंदोलक विद्यार्थ्यांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे. चर्चेतून शांततेने मार्ग काढू, असे त्या म्हणाल्या. पण सध्या ज्यापद्धतीने आंदोलन पेटले आहे, ते पाहता विद्यार्थी चर्चेचे निमंत्रण स्वीकारतील, असे दिसत नाही.देशाच्या आरक्षण प्रणालीमध्ये मुलभूत बदल करण्याची मागणी करत गेल्या आठवडाभरापासून ढाक्यासह विविध शहरांमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. दोन दिवसांपासून आंदोलन अधिकाधिक हिंसक होत असून गुरुवारी राजधानीच्या अनेक भागांत जाळपोळ आणि तोडफोडीला उधाण आले. आंदोलकांनी सरकारी इमारती तसेच विद्यापीठांना लक्ष्य केले. दूरचित्रवाणी केंद्राच्या फाटकाची मोडतोड करण्यात आली, तर परिसरातील वाहनेही जमावाने पेटवून दिली. मंगळवारी हिंसाचारात सात जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मागच्या पाच दिवसांत ही संख्या आता १०५ वर पोहोचली आहे.

### वादग्रस्त विधानामुळे आंदोलन चिघळले?

शेख हसीना या बांगलादेशच्या पंतप्रधानपदी चौथ्यांदा निवडून आल्या आहेत. ''स्वातंत्र्यसैनिकांची मुले, नातवंडे प्रतिभावान नाहीत का? रझाकारांची मुले, नातवंडेच फक्त प्रतिभावान आहेत का?'' असा सवाल पत्रकार परिषदेत करत त्यांनी आंदोलकांना 'रझाकार' म्हणून हिणवले. रझाकार हा अरबी शब्द असून त्याचा शब्दश: अर्थ 'स्वयंसेवक' असा आहे. मात्र बांगलादेशात हा शब्द हीन भावनेतून वापरला जात असून त्याचा अर्थ 'देशद्रोही' असा होतो.

### 'रझाकार' या निमलष्करी दलाची

पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल टिक्का खान यांनी अवामी लीगच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली मुक्ती चळवळ चिरडण्यासाठी 'रझाकार' या निमलष्करी दलाची स्थापना केली. पाकिस्तानी सशस्त्र दलांसोबत काम करताना या दलाने बांगलादेशींवर अक्षरश: अत्याचार केले. त्यामुळे बांगलादेशात रझाकार या शब्दाला हीन छटा आहे. हसीना यांनी आंदोलक विद्यार्थ्यांना 'रझाकार' असे संबोधल्याने आंदोलन अधिक पेटले.

## परळीत आता 'तिसरा डोळा' ठरेल 'विघ्नहर्ता'

मंत्री धनंजय मुंडे : साडेतीन कोटी खर्चाच्या सीसीटिव्हीचे लोकार्पण




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुन्हेगारीवर वॉच ठेवण्यासाठी पोलिसांचा तिसरा डोळा समजली जाणारी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची निगराणी यंत्रणा सर्वांसाठीच 'विघ्नहर्ता' ठरणार असल्याचा विश्वास कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालामंत्री ना.धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.साडेतीन कोटी खर्चाच्या सीसीटिव्ही निगराणी यंत्रणेचे परळीत ना.धनंजय मुंडे यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आले.

जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण व कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण अशा सीसीटीव्ही निगराणी यंत्रणेसाठी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून जिल्हा नियोजन समितीमधून साडेतीन कोटी रुपये तरतूद करून ही यंत्रणा परळी कार्यान्वित करण्यात आली आहे. परळीतील हा तिसरा डोळा म्हणजेच सीसीटीव्ही निगराणी यंत्रणेचा लोकार्पण सोहळा परळी पोलीस ठाण्यात ना. धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाला. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपविभागीय अधिकारी चोरमले, पोलीस निरीक्षक लोहकरे, ढोणे, पाटील आदी पोलीस अधिकारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पान २ वर...

## विशाळगड प्रकरणात कारवाई करा

डॉ. ज्योती मेटे: प्रशासनाने योग्य पावले उचलली नाहीत




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विशाळगडावर असलेल्या आनधिकृत अतिक्रमणाचा वादाचा विषय वर्षानुवर्ष चालत आला आहे. याविषयी शासन आणि प्रशासन यांनी नेहमीच दुर्लक्ष केले. त्यामुळे हा विषय अद्याप मार्गी लागलेला नाही. असे असताना दोन दिवसांपूर्वी विशाळगडावर घडलेल्या प्रकाराला प्रशासनही जबाबदार आहे. योग्य वेळी योग्य पाऊले उचलली असती तर घडलेला प्रकार टाळता आला असता. सद्य परिस्थिती सर्व समाज महाराष्ट्रभर गुण्यागोविंदाने नांदत असताना अशा घटना घडतात तेव्हा या घटनेमागे नेमके कोण समाजकंटक आहेत याचा शोध शासनाने व प्रशासनाने घेवून त्यांच्यावर कारवाई करावी असे मत शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे व्यक्त केले.

त्याचबरोबर प्रशासनाने अनधिकृत अतिक्रमण असल्यास हटवावे परंतु त्याचवेळी निरपराध पान २ वर...

## परळी प्रदुषणाची उच्च न्यायालयाकडून दखल

दणका : महाजनको व प्रदुषण मंडळाला बजावली नोटीस



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी औष्णिक वीज प्रकल्पामुळे होत असलेल्या गंभीर प्रदूषणाविरोधात वडगाव दादहरी ग्रामपंचायतीच्या सरपंचाने दाखल केलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी करंताना या रिटचा जनहितार्थ निर्णय घेतला आहे. याचिकेचे जनहितार्थ रुपांतर करत १३ ऑगस्ट पर्यंत बाजू मांडण्याविषयी महाजनको व प्रदूषण नियंत्रण मंडळाला नोटिस जारी केल्या आहेत.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांचा समावेश असलेल्या हायकोर्टाच्या खंडपीठाने परळी वैजनाथ औष्णिक प्रकल्पातून वर्षानुवर्षे निघणाऱ्या फ्लाय श तसेच स्लरीमुळे आजूबाजूच्या शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर नापीक जमिनीत रूपांतर होत असल्याची गंभीर दखल घेतली आहे. पशुधन तसेच मानवी जीवनावर थेट परिणाम होत असल्याचे म्हणत उच्च न्यायालयाने राज्य सरकार, महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (महाजनको), आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (चझउइ) यांना नोटीस बजावली.परळी तालुक्यातील वडगाव दादहरी येथील सरपंच अश्विनी कुक्कर यांनी वकील प्रशांत बर्डे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट दाखल करून औष्णिक वीज केंद्रातून निघणाऱ्या फ्लाय श आणि स्लरीमुळे होणाऱ्या प्रदूषणावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली होती. कुकर यांनी पान २ वर...

## गरिबांची मुलं घेताहेत मोफत शिक्षण!

मनोज जाधव | २ हजार २६ विद्यार्थ्यांना मिळणार इंग्रजी शाळेत प्रवेश



**बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी**

आरटीई प्रवेश प्रक्रियेत शासनानं आरटीईच्या नियमात काही बदल करत त्याबाबतचा नियमबाह्य अध्यादेश फेब्रुवारीत काढण्यात आला होता. मात्र हा अध्यादेश मुंबई हायकोर्टाकडून रद्द करत इंग्रजी शाळा आणि सरकारला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील असा आदेश दिल्या नंतर लागलीच रज्याच्या शालेय शिक्षण विभागाने काल दि. २० जुलै रोजी निवड याद्या प्रसिद्ध केल्या. यात राज्यात एकूण ९३ हजार ९ विद्यार्थ्यांची निवड झाली असून जिल्ह्यामध्ये २ हजार २६ विद्यार्थ्यांची निवड मोफत प्रवेशासाठी झाली आहे. आता या विद्यार्थ्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार आरटीई प्रवेश देणे बंधनकारक आहे अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.

रखडलेल्या आरटीई प्रवेश प्रक्रियेमुळे अर्ज दाखल केलेले सर्वसामान्य, गोरगरीब पालक चिंतेत होते आपल्या पाल्यांचा प्रवेश कुठे घ्यायचा असा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. मात्र न्यायालयाने या पालकांना दिलासा देत प्रवेश प्रक्रिया सुरू केले असून यात जिल्ह्यातील २ हजार २६ विद्यार्थ्यांना आता मोफत प्रवेश मिळणार आहे. याकरिता ज्या विद्यार्थ्यांची निवड मोफत प्रवेशासाठी झाली आहे. त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या वतीने एसएमएस पाठवण्यात येतील त्यानंतर सर्व पान २ वर...

### पालकांना सूचना

निवड यादीतील प्रवेश पात्र बालकाच्या पालकांनी अर्ज भरताना जी कागदपत्रे नोंदविली आहेत त्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रति व साक्षांकित प्रति घेऊन तालुका निवड समिती कडे जावे तसेच आपल्याला मिळालेल्या अलॉटमेंट लेटरची प्रिंट त्यांच्या लॉगिन मधून किंवा पडताळणी समितीकडे जाऊन काढावी काढून घ्यावी. पालकांनी आपल्या बरोबर आरटीई पोर्टलवर असलेली हमी पत्राची प्रिंट देखील घेऊन जावी.आणि पडताळणी समितीकडे जाऊन विहित मुदतीत आपला प्रवेश ऑनलाइन निश्चित करावा.आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित झाला आहे याची रिसीट पडताळणी समितीकडून घेणे आवश्यक आहे.

## मुलाच्या खून प्रकरणात आईला जामीन मंजूर!

ॲड.अविनाश गंडले : न्यायालयात मांडला प्रभावी युक्तिवाद



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील शेख नाजीया शेख तैवर रा. दाऊदपुरा बीड ही तीचा मुलगा शेख इजान वय- १४ वर्षे, यांच्या सोबत घरामध्ये असताना तीने त्याचा कान, तोंड, मान, कशाच्या तरी सहाय्याने दाबुन त्याचा खुन केला असा आरोप शेख नाजीया वर करण्यात आला होता. याबाबत पोलीसांनी आकस्मात मृत्यूची नोंद ०४/२०२४ नुसार दाखल केली होती. यामध्ये तपासी अधिकारी यांनी शेजारील लोकांचे अनेकांचे जवाब घेतले त्यामध्ये शेख नाजीया व तीचा मुलगा शेख इजान हे दोघे घरामध्ये असल्याचे सर्वजण सांगत होते व नाजीया हीचे प्रेमसंबंध इतराशी जोडलेले होते व तसा जवाब दिला होता. त्याअनुषंगाने पोलीसांशी ड्रीीं ड्यशप या थेरीनुसार आरोपी ही मयतासोबत शेवटच्या क्षणी असल्यामुळे पेठ बीड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४४/२०२४ कलम ३०२ भा.दं.वि. नुसार दाखल झाला, त्यामध्ये तपास झड्ख उबाळे कडे देण्यात आला होता. त्यानंतर सदरील गुन्ह्याचे गांभीर्य पाहुन गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अशोक मुद्दीराज यांचेकडे देण्यात आला. या प्रकरणात पोलीस निरीक्षक अशोक मुद्दीराज यांनी आजु बाजुच्या लोकांचे संशयीताचे जवाब घेतले व आरोपीस दिनांक ०७/०३/२०२४ रोजी अटक केले तेंव्हा पासुन आरोपी ही जिल्हा कारागृह बीड येथे कैद आहे. त्यानंतर पान २ वर...

# जम्मूचे नवे काश्मीर!

जम्मू-काश्मिरातील घटना अनेक कारणांसाठी चिंता वाढवणाऱ्या आहेत. या राज्यातील दहशतवादास आळा घालण्यास केंद्र सरकारला सातत्याने येणारे अपयश हा एकच मुद्दा या संदर्भात विचारात घेऊन चालणार नाही. तसेच या प्रदेशास लागू 'अनुच्छेद ३७०' रद्द केल्यानंतर सर्व काही सुरळीत कसे आहे असे केले जाणारे दावे आणि त्यांतील तद्दन फोलपणा इतकाच विचार करून चालणारे नाही. हे मुद्दे आहेतच आहेत. पण त्यांच्या बरोबरीने जम्मू-काश्मिरातील संघर्षास अनेक नवे आयाम असून तेही विचारात घेतल्यास परिस्थिती किती गंभीर आहे हे लक्षात यावे.दहशतवाद्यांकडून सुरक्षारक्षकांना सातत्याने केले जाणारे लक्ष्य ही यातील सर्वाधिक गंभीर बाब. विशेषत: 'राष्ट्रीय रायफल्स'सारख्या लष्कराच्या अत्यंत प्रशिक्षित आणि या परिसरांतील लढाईचा अनुभव असलेल्या तुकडीतील सैनिक या हल्ल्यांत बळी जात असतील तर ही चिंता अधिकच वाढते. ते गांभीर्य लक्षात यावे यासाठी हा काही तपशील : जम्मू-काश्मिरात २०२२ साली एकूण १५८ दहशतवादी हल्ल्यांतील फक्त तीन घटनांत सुरक्षा यंत्रणांस लक्ष्य केले गेले आणि त्यातून सहा जवानांना मरण आले. नंतर २०२३ साली काहीसे कमी म्हणजे १३४ हल्ले झाले आणि त्यात लष्करावरील हल्ले तीनच राहिले. पण बळी गेलेल्या जवानांची संख्या २१ वर गेली. या पार्श्वभूमीवर यंदाच्या पहिल्या सात महिन्यांतील एकूण ८७ दहशतवादी हल्ल्यांत सुरक्षा दलांवरील हल्ल्यांची संख्या दुप्पट झाली असून यात ११ जवानांचा बळी गेला आहे. इतकेच नाही तर सामान्य नागरिकही या हल्ल्यांत मारले गेले. तथापि २०२२, २०२३ या वर्षांत सुरक्षा दलांनी टिपलेल्या दहशतवाद्यांची संख्या अनुक्रमे १४ आणि २० इतकी होती. ती यंदा तूर्त पाच इतकीच आहे.दहशतवाद्यांच्या सरकत्या केंद्राची. इतकी वर्षे काश्मीर खोऱ्यांत दहशतवादी हल्ले घडून येत आणि तेथेच अधिक चकमकी झडत. गेल्या काही महिन्यांत हे केंद्र काश्मीर खोऱ्यातून जम्मूकडे सरकताना दिसते. काही लष्करी तज्ज्ञांच्या मते हे सरकणे पूर्ण झाले असून त्यामुळे नवीन आव्हाने निर्माण झालेली आहेत. जम्मूचा परिसर हा अधिक डोंगराळ आणि अधिक घनदाट जंगलांचा आहे. त्यामुळे दहशतवाद्यांस मोठा आसरा मिळतो आणि त्याचमुळे लष्करांस त्यांचा माग काढणे अधिकाधिक अवघड जाते. तसेच या डोंगरीपणामुळे मोठे आव्हान हे प्रत्युत्तर देणाऱ्यांसमोर- म्हणजे सुरक्षा दलांसमोर- निर्माण होते. उदाहरणार्थ ताजे दोन हल्ले. ते कथुआ आणि दोडा अशा दोन ठिकाणी झाले. या दोघांत साधारण २०० किमी अंतर आहे. त्यामुळे एका हल्ल्यास तोंड देण्यास सुरक्षा यंत्रणा मग्न असताना थोड्या वेळात दुसरीकडे हल्ला होतो. हे एक. आणि दुसरे असे की या डोंगरीपणाचा फायदा उठवत दहशतवादी आपले ईप्सित साध्य झाले की सुरक्षितपणे सीमापार जाऊ शकतात. काश्मीरप्रमाणे त्यांना त्याच प्रदेशात वास्तव्य करावे लागत नाही. आणि यातील शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्या प्रदेशाची सूत्रे स्थानिक प्रशासनाहाती देण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई. 'योग्य परिस्थिती' नाही असे कारण पुढे करत सरकार निवडणुका घेणे टाळू शकते. तथापि १९९६ आणि २००२ या वर्षांत अत्यंत स्फोटक स्थिती असूनही जम्मू-काश्मिरात विधानसभा निवडणुका झाल्या. तेव्हा काही ना काही कारणाने निवडणुका टाळणे हे अधिक विस्फोटक ठरेल. जम्मूचे रूपांतर 'काश्मिरा'त होऊ देणे घातक ठरेल. ते तसे होताना दिसते. ही प्रक्रिया रोखणे हे निवडणुकांतील यशापयशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

# अन्वयार्थ: आता खरी कसोटी



राष्ट्रवादीतील बंडाला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. अजित पवार यांना उपमुख्यमंत्रीपदासह त्यांना हवे असलेले अर्थ खातेही मिळाले. राष्ट्रवादीच्या उर्वरित नऊ जणांना सत्तेची ऊब मिळाली. अजितदादांबरोबर गेलेल्या आमदारांना मतदारसंघांतील कामांसाठी भरभरून निधी मिळाला. तर भाजपला शरद पवार यांच्या पक्षात वा घरात फूट पाडण्याचे ऐहिक समाधान मिळाले. सिंचन घोटाळ्यावरून ज्या अजित पवारांविरोधात बैलगाडीतून कागदपत्रे नेण्याएवढे पुरावे असल्याचे सांगितले गेले त्याच अजित पवारांना भाजपने पावन करून घेतले. अजित पवारांना सत्ता हवीच होती, पण भाजपलाही अजितदादा हवेच होते. आधी गोड बोलून मैत्री करायची, बोट पकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरायचे, यश मिळाल्यावर त्याच पक्षाला धक्क्याला लावायचे ही भाजप रणनीती शिवसेना, अकाली दल, आसाम गण परिषद, महाराष्ट्रवादी गोमांतक पक्ष, बिजू जनता दल या प्रादेशिक पक्षांबाबत अनुभवास आली. नव्याची नवलाई संपताच भाजपने अजित पवारांनाही रंग दाखविण्यास सुरुवात केली. त्यातून अजित पवारांची चांगलीच कोंडी झाली. अजित पवारांकडील वित्त खात्याच्या फायली या फडणवीस यांच्याकडे आधी जातील व नंतर मुख्यमंत्र्यांकडे जातील, असा प्रशासकीय आदेश काढण्यात आला. वास्तविक सरकारी नियमानुसार मंत्र्यांकडील फाइल ही थेट मुख्यमंत्र्यांकडे जाण्याची तरतूद आहे. अजितदादांचा नाइलाज झाला. नवाब मलिक जामिनावर सुटल्यावर नागपूर अधिवेशनात नुसते सत्ताधारी बाकावर बसले असता फडणवीस यांनी अजितदादांना खलिता पाठवून मलिक महायुतीत नको, असे बजावले. तसेच हे पत्र माध्यमांना मिळेल याची व्यवस्था करण्यात आली. मोदी - ३ सरकारमध्ये कॅबिनेट दर्जाच्या मंत्रीपदाची राष्ट्रवादीची मागणीही मान्य करण्यात आली नाही आणि ते नको असेल तर शांत बसा, असा संदेश दिला गेला. वर्षभरात राष्ट्रवादीचे खच्चीकरणच कसे होईल यावर भाजपच्या मंडळींचा अधिक कटाक्ष राहिलेला दिसतो.महायुतीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटही असताना राज्यातील अपयशास फक्त अजित पवारच जबाबदार कसे, असा सवाल आता राष्ट्रवादीकडून करण्यात येत आहे. लोकसभेत भाजपचे खासदारांचे संख्याबळ २३ वरून ९ वर घटले. शिंदे गटाच्या सातच जागा निवडून आल्या. तरीही अजित पवार यांच्यावरच खापर का फोडले जाते? संघाच्या वर्तुळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत काहीच भूमिका मांडली जात नाही. शिंदे हे हिंदुत्वाचा पुरस्कार करीत असल्यानेच त्यांच्याविरोधात संघ परिवाराशी संबंधित नियतकालिकांमधून कदाचित भूमिका मांडली गेली नसावी. पण दोन्ही नियतकालिकांमधील रोख हा अजित पवारांवरच आहे. या पार्श्वभूमीवर 'भाजपला आता अजित पवार नकोसे झाले असावेत' ही शरद पवारांची प्रतिक्रिया महत्त्वाची ठरते.

शिवसेना व राष्ट्रवादीत फूट पडल्याचा लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपला नक्कीच फायदा झाला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला राज्यात लोकसभा निवडणुकीत ४२ टक्के मते मिळाली. त्यात भाजपला २६ टक्के तर मित्रपक्षांचा वाटा १६ टक्क्यांचा आहे. ही फूट पडली नसती तर भाजपची अवस्था अधिक दारुण झाली असती. मुख्यमंत्रीपदाच्या आशेने अजित पवार यांनी भाजपशी सलगी केली हे तितकेच खरे. पण राज्यातील भाजप नेत्यांकडून केली जाणारी कोंडी किंवा संघ परिवाराकडून होणारी हेटाळणी यातून अजित पवारांचा पुढील राजकीय प्रवास वाटतो तितका सोपा नाही. विधानसभा निवडणुकीचे जागावाटप कसे होते हे महत्त्वाचे. विधानसभेसाठीही कमी जागा वाट्याला आल्या आणि आमदारांचे तेवढे संख्याबळ नसल्यास भाजप राष्ट्रवादीला फारसे महत्त्वही देणार नाही. अजितदादांचे परतीचे दोर आधीच कापले गेले आहेत. आता भाजपशी जुळवून घेण्याशिवाय पर्याय नाही. नेमके हेच भाजपच्या मंडळींनी हेरले आहे. यामुळेच अजित पवारांची आता खरी कसोटी आहे.

## पान एक वरून

**परळीत आता 'तिसरा डोळा'...**

जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती.परळी शहरात सीसीटीव्ही च्या माध्यमातून निगराणी ठेवण्यासाठी १३३ सीसीटीव्ही कॅमेरे विविध ठिकाणी बसवण्यात आले आहेत. याचा नियंत्रणकक्ष पोलीस ठाण्यात निर्माण करण्यात आला आहे. पंधरा बाय आठच्या मोठ्या स्क्रीनवर २४ तास प्रशिक्षित पोलीस कर्मचारी हे या माध्यमातून निगराणी ठेवणार आहेत. अतिशय अद्यावत अशा प्रकारची यंत्रणा निर्माण करण्यात आलेली असून ही यंत्रणा सर्वांना उपयुक्त ठरेल असा विश्वास यावेळी पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी बोलताना व्यक्त केला.

पुढे बोलतांना पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी सांगितले की, गुन्हेगारी नियंत्रणासाठी पोलिसांकडून सातत्याने वेगवेगळ्या कारवाया होत असतात. त्यात गुन्हेगारांवर आणखी वचक निर्माण व्हावा,कायदा- सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या सीसीटिव्ही यंत्रणेची मोलाची मदत होणार आहे. सीसीटीव्हीकॅमेऱ्याच्या मदतीने गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी पोलिसांना मदत तर होईलच, शिवाय नागरिकांच्या स्वसुरक्षिततेचा हेतू साध्य होऊ शकेल. चेन स्नॅचिंग, चोरी, घरफोडी, महिलांची छेडखानी, टवाळखोरी आदींना आळा, तर अपघाताबाबत माहिती समोर येऊ शकेल. अनेक गैरप्रकारांना चाप, गुन्हेगारांना वचक बसू शकेल. जनता भयमुक्त राहू शकेल.तिसरा डोळा अर्थात सीसीटीव्ही कॅमेरे सुरू झाले असून, त्यांचा कंट्रोल पोलिसांकडे असणार आहे.शहरातील १३३ कॅमेरे वाहतुकीसह सर्व चित्र पोलिसांच्या नियंत्रण कक्षातील एलसीडी वॉलवर बघता येत आहे. त्यामुळे पोलिसांना या नियंत्रण कक्षातूनच निगराणी करता येणार आहे.नियंत्रण कक्षात १५ बाय ८ फुटांची एलसीडी वॉल बसवली आहे. डबल पॅनलचे मॉनिटरही असून, त्यावर सीसीटीव्हींचे चित्रीकरण बघता येईल. या प्रणालीद्वारे संपूर्ण शहरावर लक्ष ठेवता येणार आहे.ही यंत्रणा सर्वांना उपयुक्त ठरेल असा विश्वास यावेळी पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी बोलताना व्यक्त केला.

**विशाळगड प्रकरणात कारवाई...**

नागरिकांना वेठीस धरू नये. याची प्रशासनाने काळजी घ्यावी. आणि सुजाण नागरिकांनी कोणत्याही धर्माचा अथवा धार्मिक स्थळांचा अवमान न करता इतर नागरिकांना सामंजस्याने सोबत घेऊन शांतता राखावी जेणेकरून शासन व प्रशासन कायदेशीर मार्गाने उपाय योजना करू शकेल आणि सर्वांनी शांतता राखावी अशीही विनंती डॉ. मेटे यांनी केली आहे.

**परळी प्रदुषणाची उच्च न्यायालयाकडून....**असा दावा केला की, कोळसा हे संयंत्र चालवण्यासाठी वापरले जाणारे प्राथमिक इंधन असल्याने, त्याचे अवशेष सुमारे ३ चौ.कि.मी.च्या परिसरात खुलेआम रचले जातात, ज्यामुळे अनेक किलोमीटरच्या परिघात पर्यावरणीय समस्या निर्माण होतात..बर्डे यांनी सांगितले की, महाजनको आणि थर्मल प्लांट व्यवस्थापन पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नसल्याचा ग्रामपंचायतीचा मुख्य युक्तिवाद आहे. प्रदूषणामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याच्या समस्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. आजूबाजूचा परिसर आणि शेतीवरही गंभीर परिणाम झाला आहे, जमिनी आधीच नापीक झाल्या आहेत.माणसं आणि पशुधन सारखेच समस्यांना तोंड देत आहेत. फ्लाय शच्या सततच्या वाहतुकीमुळे गावातील रस्त्याचीही दुरवस्था झाली आहे. वीज गरजेची आहेच पण प्रदूषणावर नियंत्रण मिळवणेही गरजेचे आहे. दुर्दैवाने, प्लांट चालवणाऱ्या महाजेनकोने हे केले नाही असे ड. बर्डे म्हणाले. याचिकेत असेही निदर्शनास आणले आहे की, ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींमुळे, प्रदुषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) या समस्येची दखल घेतली परंतु आजपर्यंत कोणतेही प्रतिबंधात्मक किंवा उपचारात्मक उपाय सुरू करण्यात आलेले नाहीत. याची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत नोटीस जारी केल्या आहेत. हायकोर्टाच्या विभागीय खंडपीठाने नोटीस जारी करताना, विशेषत: राज्य सरकार, एमपीसीबी आणि महाजेनको यांना या समस्येचे निराकरण करण्यासाठी उचललेल्या पावलांवर विशिष्ट उत्तरे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.सुनावणी दरम्यान राज्य सरकारतर्फे सरकारी वकील अमरजीत गिरासे, एमपीसीबीतर्फे उत्तम बोंदर आणि महाजेनकोतर्फे राहुल तांबे यांनी काम पाहिले.

**मुलाच्या खून प्रकरणात आईला...**

तपासी अधिकारी यांनी सेशन केस क्र. ८८/२४ नुसार दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात ड. अविनाश पं. गंडले यांनी आरोपीला कशा पध्दतीने विनाकारण गोवण्यात आले व शेख इजान यास मारणारा व्यक्ती दुसरा असताना फक्त आई व मुलगा एकत्र असल्यामुळे फक्त संशयावरुन शेख नाजीया हीस आरोपी बनवले असा युक्तीवाद केला. तसेच प्रकरणाचा सखोल तपास तपासी अधिकारी यांनी केला नाही व दोषारोपपत्रामधील त्रुटी व कलम ३०२ भा.दं.वि. आरोपीवर लागत नाही असे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सदरील बहुचर्चीत प्रकरणाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते, ड. अविनाश पं. गंडले यांनी आरोपीच्या वतीने केलेला अभ्यासपुर्ण युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीची मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांनी दिनांक १८/०७/२०२४ रोजी जामीनवर मुक्तता केली. आरोपीच्या वतीने फौजदारी क्षेत्रातील प्रसिध्द विधीज्ञ ड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहीले त्यांना ड. ईमरान पटेल, ड. बप्पा माने, ड. किरण मस्के, ड. सुरक्षा जावळे, ड. सचिन गिरी, ड. शुभम सरवदे. ड. राजेश शिंदे यांनी सहकार्य केले.

**गरिबांची मुलं घेताहेत...**

कागदपत्रासहित पालकांनी तालुकास्तरीय गटशिक्षण अधिकारी कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीकडे आपल्या कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करून घ्यावयाचे आहेत. निवड समितीकडून प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे शाळेना करून घेणे बंधनकारक असणार आहे. जर आरटीई प्रवेश देण्यास शाळा टाळाटाळ करत असतील किंवा पैशाची मागणी करत असतील तर पालकांनी शाळेविरोधात लेखी तक्रार द्याव्यात असे आव्हान मनोज जाधव यांनी केले आहे.

## पान सहा वरून

**पिंपरखेडमध्ये तीस वर्षापासून**

अनेक संघर्ष आले नोकरीला लागल्यानंतरही अनेक दिवस पगाराशिवाय काम करण्याची वेळ आल्यामुळे त्यांचे कुटुंब अडचणीत आलं होतं. तरीही त्यांनी धीर धरून काम केलं आणि समाजसेवा चालूच ठेवली. या काळात त्यांनी पिंपरखेड येथील विद्यार्थ्यांसाठी क्लासेस चालू केले. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाची निर्मिती करून गावातील विद्यार्थ्यांसाठी विविध ज्ञानसंपन्न ग्रंथ उपलब्ध करून दिले. या ग्रंथ पुस्तकाचा उपयोग गावातील अनेक विद्यार्थ्याला होऊ लागला. त्यामुळे अनेक विद्यार्थी देखील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्यामुळे घडले आहेत. या वाचनालयाच्या माध्यमातून अनेक वर्षापासून सामाजिक उपक्रम राबविले जातात. गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणही केले जाते. शालेय विद्यार्थ्यांना मनोबल वाढावं मुलींना पालकांनी शाळेत पाठवावं यासाठी प्रकाश खळगे सर यांनी वेळोवेळी प्रयत्न केले. मुलींसाठी त्यांनी गावात क्लासेस सुरू करून अनेक मुलींना शिक्षणाची दारे उघडी करून दिली. प्रकाश खळगे सर यांच्यामुळे अनेक मुली शिकल्या आणि आज त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. प्रकाश खळगे सर यांनी यावर्षी देखील त्यांच्या वाचनालयाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. आज रविवार दिनांक २१ जुलै रोजी छत्रपती शाहू महाराज वाचनालय पिंपरखेड येथे ग्रंथ प्रदर्शन त्याचबरोबर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. यावेळी ग्रंथ वाचक जनजागृती करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी गावच्या सरपंच लता शिंदे, उपसरपंच अशोक निपटे, दत्तगुरु बँकेचे अध्यक्ष गजानन निपटे, पत्रकार सतीश मुजमुले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमासाठी पिंपरखेड आणि वडवणी तालुक्यातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्यासह या वाचनालयाच्या अध्यक्ष कु. विशाखा प्रकाश खळगे, ग्रंथपाल सौ. पल्लवी कोरडे, सहा. ग्रंथपाल सौ. शिलाताई उजगरे यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये अग्नीताई खळगे, प्रा. उदय खरात, क्रांती खळगे, सविता खळगे यांचे देखील सहकार्य लाभणार आहे.

**लाचेच्या आरोपातून निर्दोष**

करण्यात आले आसता अभियोग पक्षाचे साक्षीदार तपासल्यानंतर दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकल्यानंतर दिनांक १८/७/२०२४ रोजी मा जिल्हा सत्र न्यायालयाचे प्रथम न्यायाधिश कुनाल जाधव साहेब यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली या दोन्ही आरोपीची बाजु वकील आशोक ससाणे यांनी मांडली व त्यांना सहकार्य करणारे वकील पोपट इतापे व आशिषकुमार टोपे यांनी सहकार्य केले.

**केजमध्ये गजापुर घटनेच्या**

बांधवांची उपस्थिती होती. आपल्या मागण्याचे निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले.

विशाळगड घटना प्रकरणाचा निषेध

विशाळगड घटने प्रकरणाचा आपण जाहिर निषेध करत असून अतिक्रमणे सरसकट काढण्याची कारवाई प्रशासनाने तातडीने करावी. अतिक्रमणाचे समर्थन होवूच शकत नाही. परंतु अशा घटना आडून महाराष्ट्राची सामाजिक घडी कोण विसकाटू पाहात आहे याचा शोध घेतला पाहिजे. कोणीही कायदा हातात घेवू नये, जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे बीडचे खा. बजरंग सोनवणे यांनी म्हंटले आहे.

**केजमध्ये अवैध धंद्याचा**

काही घेणे देणे नाही.त्यांना फक्त महिन्यांकाठी या अवैध धंद्यावाल्याकडुन येणाऱ्या हप्त्याची चिंता आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.कारण यांच्यावर कारवाई करावी तर महिन्याकाठी येणारा मलिदा आपल्या मिळणार नाही म्हणून ते देखील याकडे कानाडोळा करतात कारण एक विचार जर केला तर या ५९ गावांमध्ये प्रत्येक ठिकाणी ३/४ अवैध धंदे वाले असतात मग यांच्याकडून तर महिन्याकाठी एकत्र केला तर लाखो रुपयांचा हप्ता मिळतो की काय असाही प्रश्न उपस्थित होताना दिसत आहे..इतकेच नव्हे तर पोलिस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी व ती परत किंवा समेट घडल्यानंतर पण पैसे लागतात रक्षण करते जर असे वागत असतील तर मग सर्वसामान्य जानतेने कुठे जायचे असा प्रश्न नागरिकांना पडतो आहे.

**सिरसाळ्यात पावसाची सतत**

फरवारणी करणे योग्य ठरत नाही कारण फवारणी केली आणि काही वेळात पाऊस पडला तर फवारणी चा काही उपयोग होत नाही . फवारणीची कीटकनाशक औषधी शेतकऱ्यांनी खरेदी करुन ठेवली आहेत .पावसाने विश्रांती दिली तर फवारणीच्या कामांना वेग येणारा आहे. कापुस - सोयाबीन ह्या पिकांना फवारणी गरजेची आहे.

**अनागोंदी कारभारा विरोधात**

त्या आगीमध्ये त्या गोडाऊन मधील बऱ्याचशी मानवाच्या उपयोगी असणारे औषधे जळाली असे प्रथम दर्शनी दिसून येत आहे ही आग लागली की लावली हा मोठा प्रश्न आहे आणि म्हणून या आगीच्या तीन दिवस पहिले व तीन दिवस नंतरचे असे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे फोन रेकॉर्ड तपासल्यास कोण अधिकारी गुन्हेगार आहे त्यांना कुणाकुणाचे फोन आले किंवा त्यांनी कोणाला फोन केले हे चित्र स्पष्ट होईल आणि म्हणून प्राथमिक आरोग्य अधिकारी तिसगाव यांचे देखील फोन रेकॉर्ड तपासून त्यांच्यावर देखील योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशा मागण्या घेऊन उपोषणकर्ते छानराज क्षेत्रे हे बैठा सत्याग्रह आंदोलन करत आहेत परंतु प्रशासनाने अजुन ही त्यांचा आंदोलनांची दाखल घेतली नाही मनुन ते सोमवारपासून जिल्हा परिषद समोर घंटा नाद आंदोलन सुरू करणार आहेत

सर्व दोषीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अन्यथा आज बैठक सत्याग्रह आंदोलनास पाच दिवस झाले असून सोमवारपासून जिल्हा परिषद कार्यालय अहमदनगर येथे मोठ्या प्रमाणात बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात येणार असून त्या ठिकाणी भजन कीर्तन किंवा जागरण गोंधळ सारखे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत

छानराज क्षेत्रे

**शिवणीत धम्मदेसना कार्यक्रमाचे**

पूज्य भिक्खु शांतिदुत थेरो (छत्रपती संभाजीनगर) देणार आहेत नागपुर येथील पु.भिक्खु धम्मसेवक हे वर्षावासाचे अधिष्ठाण करणार आहेत. तर यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आयु. संतोष दिलीप गायकवाड (सामान्य प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद बीड.) कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून आयु.अभिषेक साळुंखे (व्याख्याते तथा उपसंपादक- प्रजापत्र बीड) आयु. कोमल मस्के ( व्याख्याता तथा सामाजिक कार्यकर्त्या, बीड.) हे लाभणार आहेत. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक- पूज्य भिक्खू धम्मशील थेरो (सचिव, प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड.) यांची धम्मदेसना सुश्रवण करण्यास लाभणार आहे. उपस्थित सर्व धम्म उपासक-उपासिका, बालक-बालिका व धम्मप्रेमी यांना मौजे घाटसावळी येथील समस्त बौद्ध उपासक- उपासिका यांच्यावतीने भोजनदान व खिरदान देण्यात येईल. तरी नियोजित कार्यक्रमास सर्व उपासक - उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून वेळेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक पूज्य भिक्खु धम्मशील थेरो,बीड., प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड, वर्षावास नियोजन समिती मौजे शिवणी येथील समस्त बौद्ध उपासक- उपासिका यांनी केली आहे.

**लाचेच्या आरोपातून निर्दोष**

मधे पुढील सुनावणी साठी जिल्हा सत्र न्यायालय केज येथे सदरील प्रकरण वर्ग करण्यात आले आसता अभियोग पक्षाचे साक्षीदार तपासल्यानंतर दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकल्यानंतर दिनांक १८/७/२०२४ रोजी मा जिल्हा सत्र न्यायालयाचे प्रथम न्यायाधिश कुनाल जाधव साहेब यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली या दोन्ही आरोपीची बाजु वकील आशोक ससाणे यांनी मांडली व त्यांना सहकार्य करणारे वकील पोपट इतापे व आशिषकुमार टोपे यांनी सहकार्य केले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# चिखल तुडवीत करावा लागतोय शाळेचा प्रवास!

**डॉ.गणेश ढवळे** पाटोदा तालुक्यातील चित्र

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड गावातील आरगडे वस्ती, पवार वस्ती, शिंदे वस्ती,निर्मळ वस्ती, गोरे वस्ती येथील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दासखेड गावातील जिल्हा परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत जाण्यासाठी पावसाळ्यात २ किलोमीटर अंतर हातात चप्पल घेऊन अनवानी पायाने चिखल तुडवीत जावे लागते. पावसाळ्यात आम्हाला त्रास होतो,पाय भरतात, पाय घसरून पडतोत, सटकतोत,निदान शाळेत जाण्यासाठी सरकारने चांगला रस्ता तरी द्या अशी आर्तहाक दिली असुन जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने रस्ता करून देण्यात यावा अशी खंत विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सोबत बोलून दाखवली. दरम्यान शासन एकीकडे बारावी, पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना लाडका भाऊ योजनेच्या नावाखाली हजारों रूपये देत असल्याचा गाजावाजा करत असुन दुसरीकडे मात्र शाळेत जायलाच रस्ता नसल्याचे भयाण वास्तव समोर येत असुन जिल्हा प्रशासनासाठी हि लाजिरवाणी बाब आहे.



**पण शासनाला पाझर फुटेना :** दासखेड पासुन २ किलोमीटर अंतरावरील आरगडे, पवार,निर्मळ, शिंदे,गोरे आडनावांची लोकं वस्तीवर वास्तव्य करत असुन दररोज जवळपास ३०० लोकांचा राबता याच रस्त्यावरून आहे.मात्र पावसाळ्यात रस्त्याची दुरावस्था होत असल्याने शालेय विद्यार्थी, बाजारहाट, दवाखाना, दुधदुभतं, भाजीपाला,खत बि बियाणे तसेच ईतर कामांसाठी गावात येजा करावी लागते. घटना घडलेल्या आहेत.शासनाने आम्हा वस्तीवरील ग्रामस्थांसाठी रस्ता दुरुस्त करून देण्यात यावा.अशी मागणी वस्तीवरील ग्रामस्थ नारायण शिंदे, भगवान शिंदे, सतिश ठाकुर,काका पवार यांनी केली आहे.



# ३४५ हेक्टरवरील पिके फस्त!

**नुकसान :** शेतकरी झाला हवालदिल

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

अतिवृष्टीच्या तडाख्यानंतर रानडुक्करांच्या कळपांनी सोयगाव परिसरात उच्छाद सुरू केला आहे बुधवारपासून ते शनिवार पर्यंत चार दिवसांत ३४५ हेक्टरवरील मका कपाशी सोयाबीनचे आदी खरीप पिके रानडुक्कर च्या कळपांनी फस्त केल्याचा खळबळ जनक माहिती समोर आली आहे घोसला शिवारात पन्नास एकरवरील मका पिके रानडुक्कर नी फस्त केली आहे अतिवृष्टी नंतर शेतकऱ्यांचे वन्यप्राणीनी मोठे नुकसान केले आहे त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे

सोयगाव सह गलवाडा, वेताळवाडी, जरंडी,निंबायती ,धिंगापूर,बहुलखेडा,कवली,निमखेडी उमर विहिरे घोसला या अकरा गावांत वन्यप्राण्यांच्या कळपांनी खरिपाच्या मका कपाशी उडीद मूग सोयाबीन पिकांची मुळासकट उपटून फस्त केली आहे घोसला शिवारात पन्नास एकरवरील मका पिके एकाच रात्री वन्यप्राण्यांच्या कळपांनी ताव मारून फस्त केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे दरम्यान याप्रकरणी वनविभागाने अद्यापही पंचनामे केलेले नाही

# व्यक्तिमत्व विकासाची चतु:सूत्री

**डॉ. बाबासाहेब ठोंबरे:**कौशल्य व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

लातूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय येथे जिमखाना विभाग व विद्यार्थी समुपदेशन व रोजगार कक्षाच्या वतीने कौशल्य व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख पाहुणे कृषि महाविद्यालय, डोंगशेळकी, उदगीर चे प्राचार्य डॉ. अंगद सूर्यवंशी, प्रमुख मार्गदर्शक सर नागेश जोंधळे, राहुल सुरवसे व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विष्णू रोडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वालाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले कि यशस्वी होणे करिता शिस्त, निष्ठा, समर्पण व निर्धार आवश्यक आहे. व्यक्तिमत्व विकासावर लक्ष केंद्रित करून विद्यार्थी त्यांच्या जीवनाची गुणवत्ता वाढवू शकतात. प्रमुख मार्गदर्शक सर नागेश जोंधळे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले कि सामाजिक कौशल्ये, भावनिक बुद्धिमत्ता, सहकर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे, नेतृत्व करणे, सूचनांचे पालन करणे, काम वेळेवर पूर्ण करणे, व्यक्तिमत्व गुणांचे संयोजन, प्रभावी संवाद ई. कौशल्ये विकसित केल्याने यश नक्की मिळते. ध्येय प्राप्ती व प्रगतीकरण्यासाठी विद्यार्थीनी कौशल्य व व्यक्तिमत्व विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतःला स्वीकारावे, स्वतःचा अभिमान बाळगावा, संयम व आत्मविश्वास ठेवावा असे मत डॉ. अंगद सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. कार्यशाळेच्या समारोपावेळी प्रमुख पाहुणे डॉ. दिनेशसिंह चौहान यांनी सांगितले कि यशप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी परिश्रमवृत्ती, अभ्यासूवृत्ती, सातत्य, प्रयत्न, ध्येय यांचबरोबर व्यक्तिमत्व विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कार्यशाळा यशस्विरित्या संपन्न झाली व विद्यार्थ्यांना निश्चित या कार्यशाळेचा लाभ होईल असा अभिप्राय सुमित तारख, वैश्नवी धांडगे व डॉ. योगेश भगत यांनी व्यक्त केला. जिमखाना उपाध्यक्ष डॉ. अच्युत भरोसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदन कोरडे व समृध्दी भरात्पे या विद्यार्थ्यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. राहुल चव्हाण यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सारिका भालेराव, डॉ. भास्करराव आगलावे, डॉ. महेंद्र दुधारे, डॉ. रमेश ढवळे, डॉ. विद्या हिंगे, मनीषा बगाडे, सुरेखा आंबटवाड, अश्विनी गरड, वीरभद्र दुरुगकर, संगीता सोरेकर उपस्थित होते.

# कार्बन फ्युरी औषधीने मजुरांना विषबाधा

सोयगाव:पुण्यभूमी प्रतिनिधी

मक्याच्या पोंग्यात कार्बन फीवरी औषधी टाकतांना बारा मजुरांना विषबाधा होऊन दोन गभीर मजूर झाल्याची घटना शुक्रवारी घडली. प्रकृती गंभीर आलेल्या दोघांना पुढील उपचारासाठी जळगाव येथे पाठविण्यात आले आहे.

सध्या मका पिक जोमात असुन तालुक्यातील अनेक शेतकरी आपल्या पिकाची वाढहोण्यासाठी व किड लागू नये यासाठी कार्बन फिवरी औषधीचा वापर करीत आहे. मात्र हे औषध जीव घेणे ठरत आहे. शहरातील मजुर मका पिका मध्ये पेवरी कपनीचे औषध टाकण्यासाठी गेले होते. दुपारी उन्हाचे चटके व घाम येत असल्याचे लक्षात येताच नातेवाईकांनी मजुरांना उपचारासाठी सोयगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली होती. या घटनेत दोन मजुरांची प्रकृती गभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जळगाव येथील सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर इतर दहा मजुरांवर सोयगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत .



विषबाधा झालेल्या मजुरांमध्ये पुनम गजानन झगळे (वय २५),भाग्यश्री सागर झगळे (२०),कविता संतोष करपे (२६),सिताबाई सभाजी गोतमारे (६०),सरला चंद्रकांत चौधरी (३०),वदना गजानन गोतमारे(३५),साधना समाधान चव्हाण (१३), नेहा सुधाकर वाघ (१७),अनिता संदीप चव्हाण (३०), सर्व राहणार सोयगाव हे ग्रामीण रुग्णालयात उपचार करीत असून प्रकुति सध्या चागली असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. गभीर असलेल्या समीर शेख शकील (१७)विठ्ठल संगीत पाटील (१४) दोघांना पुढील उपचारासाठी जळगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# सिरसाळ्यातील रस्ते झाले चिकचिक

**बोंबला :** अनेक ठिकाणी तलावाचे स्वरुप

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पावसाची संततधार सुरु असल्याने सिरसाळ्यातील मुख्य रस्ते चिकचिक झाले आहेत. अनेक ठिकाणी तर रस्त्यांना तलावाचे स्वरुप आले आहे. रस्त्यांच्या अशा परिस्थिती मुळे सिरसाळ्यात रहदारी करणाऱ्या लोकांना खुप त्रास सहन करावा लागत आहे. सिरसाळ्यातील मुख्य मार्ग परळी – बीड महामार्गाचे काम सुरु असल्याने मोठी दैनिक अवस्था या रस्त्याची आहे. एका बाजूने रस्ता खोदलेला असल्याने एकाच बाजूने वाहने ये–जा करतात ,मोठी कसरत या ठिकाणी करावी लागत आहे. येथील सिमेंट चा चौपदरीकरण केलेल्या रस्त्याला तलावाचे स्वरुप निर्माण झाले आहे. पाणी विल्हेवाटाचे नियोजन केले नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरच साचुन राहते आहे. रस्ता अगोदरच निकृष्ट असल्याने पुर्ण उखडला गेला आहे. मोठ मोठी भगदाडे ह्या रस्त्यावर पडली आहेत . बाजार पेठेचा हा मुख्य मार्ग आहे. यावर चालतांना खुप अडचण होत असुन रस्ता असतांना मार्ग शोधत रहदारी करावी लागते आहे. जुने बसस्थानक रस्त्याची देखील खुपच दैनिक अवस्था आहे. पाऊस सुरु असतांना हा रस्ता नदी – नाल्या सारखा दिसतो , ह्या रस्त्याची दैना फिटता फिटत नाही . एक वेळा हा रस्ता झाला होता परंतु संबंधित गुत्तेदाराने हा रस्ता खुपच खराब बनवला . याचा त्रास गावातील नागरिक, विद्यार्थी व बाजार पेठेत येणाऱ्या लोकांना होत आहे.

# नगर रोडच्या कामाला वेग द्या

**आ.संदीप क्षीरसागर:** रस्ता खोदल्याने नागरिक त्रस्त

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरातील नगर रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिरापूर धुमाळ रस्त्याचे काम गेल्या १० ते १२ महिन्यांपासून सुरू आहे. परंतु काम संथ गतीने सुरू असल्याने याचा शहरातील नागरिकांना, प्रवाशांना आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या कामाला तातडीने गती देऊन काम लवकरात लवकर पूर्ण करून घ्या अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे केली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघात शिरापूर धुमाळ ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (एन.एच.५६१) तसेच बार्शी नाका ते जरूड (३६१एफ) या एकूण २४.५ किलोमीटरच्या रस्त्याचे काम १६० कोटी रूपयांच्या निधीसह मंजूर असून या रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. जून २०२३ पासून बीड शहरातील नगर रोडवर, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिरापूर धुमाळ पर्यंतच्या टप्प्याचे काम सुरू झाले आहे. बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चर्हाटा फाटा पर्यंत गेल्या अनेक दिवसांपासून रस्ता खोदलेला आहे. रस्ता खोदला असल्याने या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात धूळ उडत आहे. उन्हाळाभर हा रस्ता खोदलेलाच होता आता पावसाळा सुरू झाला आहे तरीही रस्ता खोदलेलाच आहे. पावसामुळे या रस्त्यावर सर्वत्र चिखल होतो आणि त्यामुळे या भागातील नागरिक, या मार्गाने प्रवास करणारे प्रवासी, वाहनधारक, या मार्गाने



ये–जा करणारे ग्रामीण भागातील प्रवास व शेतकरी यांना या रस्त्यावरून प्रवास करताना भयंकर त्रास होत आहे. दरम्यान सर्व शासकीय कार्यालये, शासकीय विभागांची मुख्यालये आणि जिल्हा न्यायालय याच रस्त्यावर असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. ही बाब लक्षात घेऊन संथ गतीने सुरू असलेल्या सदरील कामाला वेग द्या. कामाचा दर्जा, प्रगती याकडे तत्परतेने लक्ष द्या. संबंधित कंत्राटदारास कामाचा दर्जा आणि गती वाढविण्यासाठी सूचना द्या. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता यांच्याकडे केली आहे.

# बीड ते नारायणगड आषाढी वारी

**अध्यात्मिक:**दिंडीत भाविकांची लक्षणिय सहभाग!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री क्षेत्र पावन भूमी नारायण गडाला बीड जिल्ह्यामध्ये धाकटी पंढरी म्हणून ओळखले जाते आज आषाढी एकादशी निमित्त खडकपूरा पेठ बीड येथील राधेश्याम प्रतिष्ठान संचलित बीड ते नारायणगड मासिक पायी वारी दिंडी सोहळा आयोजित केला जातो. काल दिनांक १७/०७/२०२४ रोजी आषाढी एकादशीनिमित्त भगवंताचे नामस्मरण करत शेकडो भाविक भक्तांनी श्रीक्षेत्र नारायण गडाचे व नगद नारायण महाराजांचे दर्शन घेतले . आषाढी वारीचा आनंद घेतला .

राधेश्याम सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडी चालक भागवताचार्य सचिनजी महाराज सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक शुद्ध एकादशीला बीड ते नारायणगड पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो .यावेळेस दुग्ध शर्करा योग वर्षातली सर्वात मोठी वारी म्हणजे आषाढी वारी . बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र



नारायण गडाच्या या पायी वारी सोहळ्यामध्ये शेकडो भावीक भक्त सामील झाले होते जागोजागी फराळाचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी पायवारी वारी निमित्त नारायण गडाला जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी विविध संघटनांनी फराळाचे आयोजन केले होते. यामध्ये सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स व्यापारी संघटना यांच्या वतीने देखील दिंडीतील वारकऱ्यांना साबुदाणा खिचडी, केळी व चहाची सोय केली होती. यावेळी दिंडी चालक सचिन महाराज सपकाळ यांचा रमेश गायके व सर्व व्यापारी संघटनेचे बांधव यांनी सत्कार केला.

**अभिनंदनिय** दिपाली उबाळे महाराष्ट्र पोलीसपदी

# एकाच कुटुंबात झाल्या तीन मुली पोलीस

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे नंदपुर येथील दिपाली चंद्रसेन उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाली आहे. बीड येथील पोलीस भरती मध्ये दिपाली उबाळेला मैदानी परीक्षेत –४० गुण व लेखी परीक्षेत ७९ असे एकूण –११९ गुण मिळाले व तिची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाली.

गेल्या ४ वर्षीपासून दिपाली दिवसरात्र पोलीस भरतीचा अभ्यास करीत होती दोन तीन वेळेस तिला अपयश देखील आले होते मात्र तीने न खचता अंगी जिद्द ,चिकाटी,अहोरात्र मेहनत घेऊन हे यश मिळवले आहे यशात वडील चंद्रसेन उबाळे आई संगीता उबाळेचा सिंहाचा वाटा आहे. तसेच मोठी बहीण ज्योती उबाळे ( माजलगाव ग्रामीण पोलीस), अश्विनी उबाळे ( पिंपरी चिंचवड पोलीस) यांचे तिला मार्गदर्शन लाभले. तसेच गुरू कृष्णा पाठक सर योध्दा कडमी व गुरु हारदे सर ऑनलाइन पोलीस अॅकॅडमी यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले.पोलीस भरतीची तय्यारी करीत असताना उर्वरित वेळेत दिपाली उबाळेने शेतामध्ये काम करून आपल्या



वडीलांना मदत करीत रात्री कठोर परिश्रम घेऊन अभ्यास केला. मोठी बहीण ज्योती उबाळे सन २०१४ ला पोलीस झाली नंतर अश्विनी उबाळे सन २०२२ पोलीस झाली व या वर्षी २०२४ ला दिपाली उबाळेची पोलीस पदावर निवड झाली अश्या एकाच कुटुंबात तीन मुली पोलीस झाल्याने उबाळे कुटुंबाने हॅट्रिक ची नोंद केली आहे.वडील कष्टाळू शेतकरी चंद्रसेन उबाळे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्याचा व महाराष्ट्र पोलीस मध्ये भरती करण्याचा निर्णय घेतला व आपल्या वडीलांच्या निश्चयाचे सार्थक करीत मुला पेक्षा मुली किती भाग्यवान असतात याचे उदाहरण या तीन बहिणींनी पोलीस होऊन दाखवले आहे. दिपालीच्या मोहिनी उबाळे व प्रियांका उबाळे या आणखी दोन लहान बहिणी पोलीस भरतीची तयारी करीत आहेत.तर लहान भाऊ वैष्णव उबाळे नीट परीक्षेची तयारी करीत आहे.ग्रामीण भागात राहून देखील प्रचंड मेहनत व अभ्यासाच्या जोरावर या उबाळे कुटुंबातील गरीब शेतकरी चंद्रसेन उबाळेच्या मुली पोलीस भरतीत यशस्वी होत आहेत हे सर्वांसाठी आदर्शवत उदाहरण आहे. एकूणच दिपाली उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाल्याबद्दल तिच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# डॉ.चिडगोपकरांना साहित्य पुरस्कार

**अभिनंदनिय :** श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या गौरवत भर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या मराठी विषयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ.सौ. अलका चिडगोपकर यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेच्यावतीने (मसाप) देण्यात येणारा डॉ.म.वि.गोखले पुरस्कृत 'प्राचार्य शं.वा.तथा सोनोपंत दांडेकर स्मृती पुरस्कार' यंदा डॉ.अलका चिडगोपकर यांच्या 'मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींची काव्यधारा' या ग्रंथाला मिळाला आहे.रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.टिळक रस्त्यावरील मसापच्या माधवराव पटवर्धन सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ.मुकुंद दातार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या पुरस्कारा बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे उप–प्राचार्य डॉ. शिवाजी मोरे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी यांनी या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले.

**सुविचार** -इतरांचे दुर्गुण शोधण्यापेक्षा त्यांच्यातील सद्गुण शोधावे.

## आव्हान वाढले....!

काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात देशात ठिकठिकाणी दहशतवादी हल्ले होत होते, आता दहशतवाद्यांची आणि या दहशतवाद्यांना ताकद देणाऱ्या पाकिस्तानची भारताकडे डोळे वाकडे करून पाहण्याची हिंमत नाही, अशी वल्गना करणाऱ्या मोदी सरकारचे दात त्यांच्याच घशात घालण्याचे काम अलीकडील काळातील वाढत्या दहशतवादी हल्ल्यांनी केले आहे. कदाचित देशाच्या आतील भागात होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांवर या सरकारच्या काळात पायबंद भलेही लागला असेल, परंतु जम्मू-काश्मीर सारख्या सीमावर्ती राज्यात दहशतवादी कारवायांना आळा घालण्यास हे सरकार साफ अपयशी ठरल्याचे अलीकडच्या घटनांवरून दिसून येते. काँग्रेस राजवटीने जम्मू-काश्मीरमध्ये लागू केलेले ३७० कलम हेच सगळ्या दुखण्याचे मूळ आहे, अशी मांडणी करत मोदी सरकारने एकदा हे कलम रद्द झाले की जम्मू-काश्मीरमध्ये सगळे कसे आबादीआबाद होईल असे चित्र रंगवले होते. अर्थात ३७० कलम रद्द व्हायला हवेच होते, परंतु जम्मू काश्मीरातील विघटनवादी ताकदींचा किंवा विचारांचा या कलमाशी संबंध जोडणे तितकेसे योग्य नव्हते, हे कलम रद्द झाल्यामुळे जम्मूकाश्मिरातील राजकीय परिस्थिती फारशी बदललेली नाही. लोकसभा निवडणुकीत या भागातील मतदारांनी चांगला उत्साह दाखवला ही एक सकारात्मक बाजू असली तरी या मतदारांनी गंभीर आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या एका व्यक्तीला निवडून दिले हे देखील लक्षात घ्यायला हवे. बुलेटद्वारे जे मिळू शकत नाही ते बॅलेटद्वारे प्राप्त करण्याचा तर हा प्रयत्न नाही ना याचीही शहानिशा होणे गरजेचे आहे. मुळात दिल्लीत सरकार कोणाचे आहे याच्याशी जम्मू-काश्मीरातील दहशतवादी ताकदींचे काहीही देणेघेणे नाही. सरकार कोणाचेही असो त्यांचे ध्येय स्पष्ट आहे. त्यांना काश्मीर भारतापासून तोडायचा आहे, पाकिस्तानलाही हेच हवे आहे, त्यामुळेच पाकिस्तानची पुरेपूर मदत या दहशतवाद्यांना मिळत असते. गेल्या अनेक वर्षांपासून काश्मिर खोऱ्यात उपद्व्याप करणाऱ्या दहशतवादी ताकदींनी यावेळी आपली रणनीती बदलल्याचे दिसून येत आहे. आता या लोकांनी काश्मीरच्या खोऱ्याऐवजी जम्मूच्या डोंगराळ भागाचा आसरा घेत दहशतवादी हल्ले सुरू केले आहेत. या आधी दहशतवादी हल्ले प्रमुख्याने काश्मीरच्या खोऱ्यामध्ये घडून येत असत. मात्र अलीकडील काळात दहशतवादी हल्ल्यांचे केंद्र जम्मूकडे सरकलेले दिसते. पूर्वी काश्मीर खोऱ्यात या दहशतवाद्यांना स्थानिक लोकांकडून भरपूर मदत मिळायची, त्यांना लपण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जायची, त्यांच्या खाण्यापिण्याची सोय केली जायची, परंतु अलीकडील काळात लष्कराच्या वाढत्या दबावामुळे स्थानिक लोकांकडून त्यांना पुरेसे सहकार्य मिळेनासे झाले. त्यामुळे त्यांनी आता जम्मू भागाकडे आपला मोर्चा वळविल्याचे दिसत आहे. हा परिसर अधिक डोंगराळ आणि घनदाट जंगलांचा असल्याने दहशतवाद्यांना लपण्यासाठी आणि हल्ला केल्यावर सीमेपलीकडे पळून जाण्यासाठी अधिक संधी मिळते. गेल्या सहा-सात महिन्यात दहशतवादी हल्ले वाढण्यामागे हे मुख्य कारण आहे. विशेष म्हणजे या काळात शहीद होणाऱ्या जवानांचे प्रमाण देखील चिंताजनकरित्या वाढले आहे. त्या तुलनेत दहशतवाद्यांचे फारसे नुकसान झाल्याचे दिसत नाही. नुकत्याच झालेल्या हल्ल्यांमध्ये दहशतवाद्यांनी अत्याधुनिक शस्त्रांचा वापर केल्याचे उघड झाले आहे. त्यातील काही शस्त्रास्त्रे अमेरिकन बनावटीची असल्याचेही आढळून आले आहे. त्यामुळेच या हल्ल्यांमध्ये अफगाणी दहशतवाद्यांचा समावेश असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. अमेरिकन सैन्याने अफगाणमधून परतताना आपली बहुतेक शस्त्रे तिथेच टाकून दिली होती, ती सगळी तालिबान्यांच्या हाती लागली. त्याच शस्त्रांचा वापर करून जम्मू-काश्मिर भागात दहशतवाद्यांनी भारतीय लष्करावर हल्ले चढविले असतील तर भारताला आता पाकिस्तानसोबतच अफगाणी शत्रूचाही सामना करावा लागण्याची चिन्हे दिसत आहेत. या पृष्ठभूमीवर 'घर मे घुस के मारेंगे'ची भाषा बोलण्यापुरती किंवा प्रचारापुरती ठीक आहे, प्रत्यक्ष मैदानात सामना करायचा तर वेगळ्या स्तरावर आणि मोठी तयारी करावी लागते. सीमेपलीकडून घुसखोरी थांबलेली नाही, ही एक मुख्य चिंता आहेच, शिवाय घुसखोरांना भारतातील काही घटकांचे सहकार्य मिळत असण्याचीही दाट शक्यता आहे. ज्या पद्धतीने सहा-सहा महिने ते लपून राहू शकतात, लष्कराच्या हालचालींची अगदी अचूक माहिती त्यांच्यापर्यंत पोहचते आणि हल्ला केल्यानंतर पळून जाण्यात ते यशस्वी होतात, हे सगळे पाहता आता भारतासमोरचे आव्हान वाढल्याचे दिसते. दिल्लीत पुन्हा मोदी सरकार सत्तेत आले याचा या दहशतवाद्यांच्या मनोबलावर आणि त्यांच्या जिहादी मानसिकतेवर कोणताही परिणाम झालेला नाही, खरे तर ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच सरकारने पुढची पाऊले उचलणे गरजेचे आहे.

## भयावह दुश्चिन्ह....!

आज संपूर्ण जगात संगणक हा एकूणच सगळ्या व्यवहाराचा 'बॅक बोन' झाला आहे. संगणकाशिवाय अगदी पान सुद्धा हलू नये अशी काहीशी स्थिती सध्या आहे. अर्थात कामाचा वेग, अचूकता आणि प्रचंड मोठी क्षमता या सगळ्याच्या बाबतीत माणसापेक्षा कितीतरी पटींनी अधिक कार्यक्षम असलेल्या मानवानेच निर्माण केलेल्या संगणकाचे वर्चस्व कुठपर्यंत मान्य करायचे, हा प्रश्न मात्र अधूनमधून उपस्थित केला जातो आणि हा प्रश्न का उपस्थित केला जातो याचे काही अंशी उत्तर शुक्रवारी मिळाले असे म्हणावे लागेल. शुक्रवारी मायक्रोसॉफ्ट विंडोजचा वापर करणाऱ्या जगभरातील वापरकर्त्यांना अडचणीला सामोरे जावे लागले. मायक्रोसॉफ्टमध्ये आलेल्या या तांत्रिक बिघाडामुळे विमानसेवा, बँक, शेअर बाजार, अशी अनेक माध्यमे ठप्प झाली. मायक्रोसॉफ्ट ३६५ ची सर्व्हिस ठप्प होण्यामागे क्राऊड स्ट्राईकमधील एक अपडेट कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. क्राऊड स्ट्राईक ही एक सायबर सुरक्षा देणारी कंपनी आहे जी मायक्रोसॉफ्टसह अन्य कंपन्यांना सायबर हल्ल्यापासून सुरक्षा देण्याचे काम करते. या कंपनीकडून एक मोठे सॉफ्टवेअर अपडेट आले होते. ज्यामुळे लोकांना अडचणींना सामोरे जावे लागले. क्राऊड स्ट्राईकने नवे अपडेट जारी केले होते. या अपडेटचे कॉन्फिग्रेशन चुकीचे झाले आणि त्याचा फटका मायक्रोसॉफ्टला बसला. हा प्रकार तांत्रिक अडचणीमुळे झाला आहे की हा एक सायबर हल्ल्याचा प्रकार आहे, ही चर्चा देखील खूप रंगली होती. तज्ज्ञांच्या मते हा सायबर हल्ला नाही. मात्र त्याची शक्यता नाकारता येणार नाही. कदाचित ही एक तांत्रिक चूक असेलही, परंतु भविष्यात एखाद्याकडून जाणीवपूर्वक असा काही प्रकार केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि तसे कुणी केलेच तर संपूर्ण जगात हाहाकार माजू शकतो. आताही या प्रकारामागे रशियाचा हात तर नाही ना, अशी चर्चा होत आहेच. आज जग एक विशाल खेडे झाले आहे आणि संगणकाच्या माध्यमातून या खेड्याचे संचालन होत असते, त्यामुळे जगाच्या कोपऱ्यात कुठेही साधे खुट्ट जरी झाले तर संपूर्ण जगाला त्याचा धक्का पोहचतो. आज अनेक लष्करी उपकरणे, बँक, विमानसेवा, शेअर बाजार, दळणवळणाच्या अन्य सुविधा अशा अनेक ठिकाणी संगणक कळीचा भाग आहे, त्यामुळे त्यात जाणीवपूर्वक बिघाड घडवून आणल्या गेला तर जगाचा डोलारा कोसळायला वेळ लागणार नाही. शुक्रवारची घटना म्हणजे भविष्यातील या भयावह शक्यतेचे दुश्चिन्हच म्हणावी लागेल.

**चौफेर**

# महायुती 'निवडणूक मोड'वर मविआ गाफीलच




आनंद आंबेकर

9850388613

कार्यकारी संपादक, देशोन्नती


लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर महायुती सावध झाली. चिंतन, मनन केल्यानंतर विधानसभेसाठी रणनीती आखण्यात आली. महायुती म्हणून एकत्र आणि पक्ष म्हणून महायुतीतील तीनही पक्षांनी पक्षपातळीवरही काम सुरू केले. महायुतीतील तीनही पक्ष आता 'मिशन विधानसभा' मोडवर आहेत.



विधानसभेचे पडघम वाजू लागले. महायुती सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प, घोषणांचा पाऊस, लाडकी बहीण योजना आणि त्याच्या जोडीला लाडका भाऊ योजना, ज्येष्ठांना तीर्थाटन अशा योजनांची घोषणा करत मुख्यमंत्र्यांनी आनंदसरींची बरसात केली. महायुती स्तरावर ही फटकेबाजी सुरू असतानाच पक्ष म्हणून महायुतीतील तीनही पक्षांनी चालविलेली तयारी 'विजय महायुतीचाच' हा संदेश देणारीच आहे. महाविकास आघाडी मात्र या तयारीत एक पाऊल मागे आहे. लोकसभेतील विजयाच्या आनंदात हुरळून जात महाविकास आघाडी अशीच गाफील राहिली, तर महायुती राज्याचे मैदान कसे मारून नेईल, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना कळणारदेखील नाही.

लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर महायुती सावध झाली. चिंतन, मनन केल्यानंतर विधानसभेसाठी रणनीती आखण्यात आली. महायुती म्हणून एकत्र आणि पक्ष म्हणून महायुतीतील तीनही पक्षांनी पक्षपातळीवरही काम सुरू केले. महायुतीतील तीनही पक्ष आता 'मिशन विधानसभा' मोडवर आहेत. महायुतीने युती म्हणून अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पुरेपूर फायदा damage control साठी करवून घेतला. सरकार म्हणून जनतेला विश्वासात घेण्यासाठी घोषणांचा पाऊस पाडला. युवा, स्त्रिया आणि ज्येष्ठ नागरिक हे जनतेतील तीन महत्त्वाचे घटक तीन योजनांच्या माध्यमातून कव्हर करण्याचा प्रयत्न केला. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी होत असलेली गर्दी लक्षात घेता आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या घोषणेनुसार खरंच रक्षाबंधनाला 'बहिणीं'च्या खात्यात तीन हजार रुपये जमा झाले, तर त्याचा मोठा फटका महाविकास आघाडीला निवडणुकीत बसू शकतो, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. युती म्हणून या योजनांची घोषणा आणि अंमलबजावणीची तयारी एकीकडे 'हिट' ठरत असतानाच पक्ष पातळीवर तीनही पक्षांची चाललेली तयारी दखल घेण्याजोगी आहे. कोण किती जागा लढवणार याच्या घोषणा अजित पवार गट आणि शिंदे सेनेतील काही नेते करत आहेत. याबाबत भाजपची भूमिका मात्र सावध आहे. तीनही पक्षांतील वरिष्ठ नेते मात्र याबाबत अद्याप काही बोलणे टाळत आहेत.

तयारीच्या बाबतीत अजित पवार गटाने आघाडी घेतलीय. ८० ते ९० जागा लढविणार, असे गृहीत धरून मतदारसंघाची चाचपणी सुरू झालीय. अजित पवार यांनी म्हणे एक प्रोफेशनल एजंसी पक्ष प्रचारासाठी ठेवलीय. प्रचाराची रणनीती, सोशल मीडियावरील प्रचार याची जबाबदारी या एजंसीकडे आहे. अजित पवारांचा १५ दिवसांपूर्वी आलेला व्हिडिओ बरंच काही सांगून गेला. हा व्हिडिओ केवळ त्यांनी स्वतःच्या एक्स अकाऊंटवर अपलोड केला नाही, तर सोशल मीडिया साईटवर जाहिरात म्हणून 'प्रमोट' केला. अनेक व्हिडिओंच्या मधात अजित पवारांचा हा व्हिडिओ जाहिरात म्हणून सुरू व्हायचा. अर्थातच विधानसभेसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बजेट मोठ्ठे असल्याचे यावरून लक्षात येतेय.

शिंदे सेनेनेही चांगली कंबर कसलीय. काल शिंदे सेनेच्या आमदारांची विधानसभा निवडणुकीच्या औचित्याने बैठक झाली. १०० जागा लढविण्याचे गृहीत धरून त्यांनीही नियोजन केले. केवळ मुंबई किंवा पश्चिम महाराष्ट्रच नव्हे, तर मराठवाडा, विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित केले आहे. इतकेच नव्हे, तर अपेक्षित मतदारसंघांत निरीक्षकांचीही नियुक्ती केली.

इकडे नियोजनात भाजप कुठेही मागे नाही. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीच्या विजयाची जबाबदारी असलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ॲक्शन मोडवर आहेत. संवाद यात्रा, पदाधिकाऱ्यांच्या बैठका, लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यासाठी आणि नवीन मतदार नोंदणी करण्यासाठी राज्यभरातील प्रत्येक शहराच्या प्रत्येक वॉर्डमध्ये लावलेले बूथ, दोन दिवस भाजप कोअर कमिटीची सुरू असलेली मॅराथॉन बैठका यातून भाजपला असलेले निवडणुकीचे गांभीर्य दिसून येते. विधानपरिषद निवडणुकीने उत्साह दुणावला आहे. या तीनही पक्षांनी केलेले नियोजन आणि अंमलबजावणी यात सातत्य राहिले, तर महायुती विजयाच्या जवळ जाईल यात शंका नाही. महाविकास आघाडीत एकटे शरद पवार सोडले तर अन्य दोन पक्षांनी अद्याप विधानसभेला गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला अशी बातमी आहे. मात्र, यावर नेते ठाम राहतील का, हे आताच सांगता येत नाही. विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस फुटली. पुढे काय होईल, सांगता येत नाही, कारण काँग्रेसच्या नेत्यांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या तुलनेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले कुठेही चर्चेत नाही. उद्धव ठाकरे अजूनही जागांच्या बाबतीत मुंबई बाहेर निघाले नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांची लोकसभेच्या यशाची झिंग अजूनही उतरली नाही. अजूनही हे गाफील आहेत. महायुती बाशिंग बांधून तयार आहे. मविआचे नेते जमिनीवर आले नाही, तर सत्तेचे स्वप्न भंग पावेल, यात शंका नाही.

**भूमिका**

# नव्या आघाड्यांचे नवे प्रयोग!




प्रा. डॉ. विनोद गायकवाड

9850324202

राजकीय अभ्यासक


आघाड्या ह्या विचारधारांवर होत नसल्याने राजकारणाची दिशा बदलली. म्हणूनच विचारधारेपेक्षा सत्ता प्राप्त करणे आणि ती टिकविणे या एकमेव उद्देशानेच तडजोडी सुरू आहेत. यामुळे पुरोगामी महाराष्ट्रासह भारताच्या राजकारणाची घडी विस्कटली.



१९८९ पासून भारतात आघाड्यांचे राजकारण स्थिरावले. जेव्हा कोणत्याही एका राजकीय पक्षाला केंद्रात आणि घटकराज्यात स्पष्ट बहुमताची शाश्वती नसते अशा परिस्थितीत आघाड्या वेग घेतात. १९९९ पासून भाजपा पुरस्कृत राष्ट्रीय लोकशाही आघाडी, तर २००४ ते २०२२ पर्यंत काँग्रेस पुरस्कृत संयुक्त पुरोगामी आघाडीने राजकारण केले. मात्र, २०१४ नंतर मोदी लाटेत संपूआची पडझड झाल्याने विरोधकांनी एकत्र येऊन 'इंडिया' या नवीन नावाने आघाडी स्थापन केली. २०२४ ची लोकसभा निवडणूक रालोआ विरुद्ध इंडिया अशी झाली, तर महाराष्ट्रात रालोआचा भाग असलेली महायुती विरुद्ध इंडियाचा भाग असलेली महाविकास आघाडी अशी सरळ लढत झाली.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील सत्तासमीकरणे बदलताना राजकीय पक्षाची आणि राजकारणाची पडझड झाली. महत्त्वाचे म्हणजे आघाडीतील मोठे घटक पक्ष आणि छोटे पक्ष यांचे लाड पुरविताना राष्ट्रीय पक्षातील निष्ठावान मात्र डावलले जातात. मग आयाराम-गयारामांची स्पर्धा सुरू होते. आपल्या नेत्याला पक्षाकडून तिकिट न मिळाल्यास त्यांची पुढील रणनीती कशी असेल? विशेष म्हणजे या लोकसभा निवडणुकीत भाजपा व शिंदे गटाच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या, तर दोन्ही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या उमेदवाराचा प्रचार करावा लागला. पारंपरिक प्रतिस्पर्धी एकत्र आल्याने लोकसभा निवडणूक कार्यकर्त्यांसाठी अवघड गेली. त्यानंतर होणारी विधानसभा निवडणूकसुद्धा अवघड जाईल.

शिवसेना आणि राष्ट्रवादीतील फुटीमुळे दोन प्रादेशिक पक्षांचे चार पक्ष झालेत. फुटीर गटही फुटीच्या उंबरठ्यावर दिसतात. सोबतीला मनसे व वंचित बहुजन आघाडी आहेच. एकूणच महाराष्ट्रातील या नवीन राजकीय प्रयोगात महाविकास आघाडीची सरशी ठरली. लोकसभेच्या ४८ पैकी ३० जागा निवडून आल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास वाढला. निवडणूकपूर्व आघाडी असल्याने जागावाटपाबाबत मित्र पक्षांसह राजकीय पक्षांच्या बैठका सुरू आहेत. प्रत्येक निवडणुकीत निवडणूकपूर्व आघाडी करताना जागावाटप कळीचा मुद्दा बनतो. त्याचा परिणाम म्हणजे २०१४ ची विधानसभा निवडणूक स्वबळावर झाली होती. जेव्हा-जेव्हा तिसरी आघाडी तयार होते किंवा त्या दिशेने प्रयत्न होतात तेव्हा त्या आघाडीवर बी टीम असल्याचा आरोप होतो.

तडजोडीच्या राजकारणात आघाडी धर्म पाळल्याच जातो असे नव्हे. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे ६ ते ७ आमदार फुटले. क्रॉस व्होटिंग झाले. योग्य रणनीतीचा वापर न केल्याने शेकापचे जयंत पाटील यांचा पराभव झाल्याची खंत पवार साहेबांनी व्यक्त केल्याने मविआत ताळमेळ नसल्याचे स्पष्ट झाले. पवार साहेब आणि छगन भुजबळ यांची अचानक झालेली भेट मराठा आणि कुणबी समाजातील समन्वयासाठी होती की, राजकीय समन्वयासाठी होती याचे उत्तर काळच देईल. एकीकडे टीका, तर दुसरीकडे पवार साहेबांचा मोठेपणा मान्य करायचा हे कसले राजकारण? अजित पवारांच्या घर वापसीबाबत विचारले असता संघर्षातील काळात सोबत असलेल्या सहकाऱ्यांसोबत चर्चा करून निर्णय घेण्याचे सुतोवाच पवार साहेबांनी केले. साप्ताहिक विवेकने अजितदादांवर टीका करताना भाजप कार्यकर्त्यांना राष्ट्रवादीसोबतची युती मान्य नाही, असे स्पष्ट मत मांडले. यापूर्वी सरसंघचालक मोहन भागवत यांनीसुद्धा याबाबत मत व्यक्त केले होते. महाराष्ट्रातील पक्ष फोडीचे राजकारण केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनाही पटले नसल्याचे त्यांनी यापूर्वीच जाहीरपणे मांडले. येणाऱ्या या अशा प्रतिक्रियांना महाराष्ट्रातील लोकसभेच्या पराभवाची किनार असून भाजपा-राष्ट्रवादी (अजित पवार) युतीला भाजपा पक्षांतर्गत आणि सामाजिक विरोध आहे हे आता लपून राहिले नाही. नेत्यांनी सत्तेसाठी वाटेल ते आणि वाटेल तसे केले तरीही मतदार स्वीकारतीलच असे नव्हे, कारण त्या तडजोडी समाजहितापेक्षा स्वहिताच्याच अधिक असतात. केंद्रात आणि महाराष्ट्रात आघाडीच्या राजकारणाशिवाय पर्याय नाही हे खरे असले, तरी त्याला वैचारिक चौकट असावी. धर्मसापेक्ष आणि धर्मनिरपेक्ष या दोन गटांच्या राजकारणाची चौकट विस्कटली. विधानसभा निवडणुकीनंतर सत्ता मिळावी म्हणून 'लाडकी बहीण', 'लाडका भाऊ','ज्येष्ठ नागरिकांना देवदर्शन', अशा योजना आणल्या गेल्यात. सत्ताकारण कसेही केले तरी हे 'लाडके भाऊ, बहीण, ज्येष्ठ नागरिक' आपल्याला सत्तेपर्यंत पोहोचवतील अशी अपेक्षा आहे. मात्र, त्यांच्यासोबत तडजोडीची, पक्ष फोडाफोडीची आणि पक्षांतराची शिदोरी आहे हेही मतदार लक्षात ठेवतात.

भारतात गेल्या पस्तीस वर्षांपासून तडजोडीचे राजकारण सुरूअसले, तरी त्यामध्ये परिपक्वता आली नाही, कारण समविचारी पक्ष आणि समान कार्यक्रम हे न सुटलेले कोडे आहे. भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्ष असलेले मित्र टिकविता आले नाहीत. प्रादेशिक पक्षाने प्रादेशिक राजकारण करताना राष्ट्रीय पक्षाकडून अवास्तव अपेक्षा ठेवल्याने त्यांनी सतत कुरघोडीचे राजकारण केले. परिणामी प्रादेशिक पक्षांनी कधी भाजपाची, तर कधी काँग्रेसची कास धरून सत्ताकारण केले. याचा सर्वात जास्त फायदा बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी घेतला. कधी भाजपासोबत, तर कधी काँग्रेससोबत, तर कधी राष्ट्रीय जनता दलासोबत आघाडी करून मुख्यमंत्रिपद टिकविले. लोकसभेचे निकाल त्रिशंकू आल्याने मोदी सरकारमध्ये तर ते किंगमेकरच्या भूमिकेत आहेत. याचा अर्थ प्रादेशिक पक्षाला घटकराज्याच्या राजकारणातच अधिक रस असला, तरी ते लोकसभेची सौदेबाजी करतात. दुसरे, विधानसभेच्या या पाच वर्षांच्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता आणि उपमुख्यमंत्री या तिन्ही पदांवर काम केले. यातूनच नवीन आघाड्या तयार झाल्यात. मग याकरिता मूल्यात्मक राजकारणाला तिलांजली दिली जाते. स्वतःला समविचारी म्हणणाऱ्या पक्षाने मर्यादा ओलांडल्याने वैचारिक राजकारणाला तिलांजली मिळाली. आघाड्या ह्या विचारधारांवर होत नसल्याने राजकारणाची दिशा बदलली. म्हणूनच विचारधारेपेक्षा सत्ता प्राप्त करणे आणि ती टिकविणे या एकमेव उद्देशानेच तडजोडी सुरू आहेत. यामुळे पुरोगामी महाराष्ट्रासह भारताच्या राजकारणाची घडी विस्कटली, हे मात्र खरे.

**चळवळ**

# आंबेडकरी विचारांना सर्वस्व मानणारे लोककवी नागोराव पाटणकर




प्रा.डॉ. इसादास भडके

9096364886

erbfes@gmail,com


नागनाथ उर्फ नागोराव खंडोजी पाटणकर यांचा जन्म अमरावतीच्या बडनेरा या भागात झाला. चौथ्या वर्गापर्यंत त्यांचे शिक्षण झाले. नागोरावांचे सारे कुटुंबच गायक होते. आई मुलाबाई, वडील खंडोजी आणि दामाजी पाटणकर गायक होते. प्रारंभीच्या काळात नागोराव पाटणकरांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सहवास लाभला. वयाच्या बाविसाव्या-तेविसाव्या वर्षापर्यंत ते महाराजांसोबत वावरले. खेडोपाडी भ्रमंती करून समाजजागृती केली. 'एक तारा खंजेरी' हे नाटक त्यांनी बसवून लोकप्रिय केले. यातून त्यांनी आपला गायकांचा संच तयार केला. प्रारंभीच्या काळात नागोरावांवर आध्यात्मिकतेचा प्रभाव होता.

१३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला मुक्कामी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सभा होती. बाबासाहेबांनी यावेळी धर्मांतराची घोषणा केली होती. या कार्यक्रमासाठी दादासाहेब गायकवाडांनी नागोरावांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. बाबासाहेबांच्या भाषणापूर्वी बाबासाहेबांनी नागोरावांना गीत सादर करायला लावले. त्यांनी 'भीम खरा भगवान रे दलिता' हे गीत सादर केले. ही गीताची काव्यपंक्ती ऐकता बाबासाहेब चिडले. बाबासाहेबांनी नापसंती व्यक्त केली. हिंदू धर्मातील 'भगवान' या संकल्पनेला विरोध केला. नंतर 'दलितो की तवारिख मुल्क हिंदोस्ता से पुछो' हे गीत नागोरावांनी सादर करताच बाबासाहेबांना आनंद झाला आणि नागोरावांच्या गळ्यात हार घातला. याच गीताने नागोरावांच्या वाटचालीला नवे वळण मिळाले. पुढे आंबेडकरी आंदोलनाला आणि विचारांना ते सर्वस्व मानू लागले. त्यांच्या नसानसांत आंबेडकर वसले.

नागोरावांना आधी मराठीशिवाय इतर भाषा अवगत नव्हत्या. सर्वत्र भ्रमण केल्यामुळे त्यांना उर्दू, हिंदी, पारशी व इंग्रजी भाषा अवगत होऊ लागल्या. संगीताचे शास्त्रीय ज्ञान नसतानाही ते हार्मोनियम चांगल्या प्रकारे वाजवायचे. 'सदा सत्य मार्गी पावले वळावी, स्वतःला स्वतःची महती कळावी', असा नागोरावांनी मानवतेचा शोध घेतला. हिंदू धर्मातील वाईट परंपरांवर त्यांनी आसूड ओढले. ते अंधश्रद्धेवर आघात करताना म्हणतात, 'ऐक रे माझ्या मित्रा सोड खंडोबाची जत्रा, मर्द असून मर्दा अंगाचा करीशी का खुर्दा', 'दिवा जळू दे सारी रात' व 'कपडा बोलतो शिप्याला' या नागोरावांच्या रचना भावनात्मक आणि भेदक आहेत.

नागोरावांनी लोकगीतातून समाजाला जागृत केले. 'दगडाचे देव सारे, काय त्याच्या पाशी। आई बाप पंढरपूर रे, मथुरा नि काशी।।' अशी वस्तुनिष्ठ जाणीव नागोरावांनी करून दिली. नागोरावांनी बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू आपल्या रचनेतून मांडले, तसेच आंबेडकरी चळवळीचा आलेखही मांडला. 'भीमरायासारखा मला विद्वान पाहिजे, हल्ली या जगी असा गुणवान पाहिजे' ही नागोरावांची रचना बाबासाहेबांना ज्ञानाचे प्रतीक म्हणून संबोधणारी आहे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर चळवळीत पृथकता निर्माण झाली. काही नेते मंडळी स्वार्थी विचाराने 'जयभीम'चा उद्घोष करू लागले. या साऱ्यांचा समाचार घेताना नागोराव म्हणतात, की 'होता अमुचा एक नेता, भीमरायाचा आसरा होता, स्वार्थी झाले सारे पुढारी, अन् 'जयभीम' बोले.' बाबासाहेबांना राष्ट्रपुरुष म्हणून संबोधताना नागोराव म्हणतात, की 'राष्ट्रपुरुष होता आला राष्ट्राच्या कामी, करू नका वेड्यांनो त्याची तुम्ही बदनामी'. चवदार तळ्याची नागोरावांनी वापरलेली प्रतिमा अर्थपूर्ण असून विचार करायला लावणारी आहे. ते म्हणतात, 'माझ्या भीमाचा हा मोठा महिमा, त्याने चवदार तळ्याचं पाणी पाठवलं'.

नागोराव पाटणकर स्वतःला जनतेचा सेवक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अनुयायी मानत. ते लोकशाहीचे समर्थन करत. लोककवी नागोराव पाटणकरांनी बाबासाहेबांच्या विचारांची ज्योत प्रज्वलित केली. निढळाच्या घामातून लोकं चळवळीकरिता वर्गणी देतात असा आत्मविश्वास त्यांचा होता. लोककवी नागोराव पाटणकरांनी कव्वालीच्या माध्यमातून वेगळे विश्व निर्माण केले होते. त्याकाळी कव्वाली म्हटले, की नागोराव पाटणकरांचे नाव लोकांच्या तोंडी असायचे. त्यांनी कव्वालीला उंच पातळीवर नेले होते. 'आंबेडकरांच्या तर्कनिष्ठ, विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, तत्त्वनिष्ठ विचारांची सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी क्रांती लोकांपर्यंत पोहचविण्यात ते धन्यता मानतात.' असे जे अभ्यासक- संशोधिका डॉ.प्रतिभा कोमल खोबरागडे-वाघमारे म्हणतात, त्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. १० सप्टेंबर १९७२ साली नागोरावांचे निधन झाले.

**वाचक विचार मंच**

## आषाढी एकादशीचे निमित्त आणि साकडे!



आषाढी एकादशीनिमित्त मोठमोठ्या नेत्यांनी विठ्ठलचरणी बळीराजाला सुखी ठेव, जातीपातीचे विष समूळ नष्ट कर, अशा प्रकारच्या मागण्यांची साकडी घातली. खरे पाहता राजकीय नेतेच बळीराजासह सामान्यांना त्यांच्या किमान मागण्यांपासून वंचित ठेवत आहेत. शेतीमालाला योग्य भाव, विमा सवलती, शेती उत्पादनांना निर्यातीचे परवाने देणे, खतांच्या किमती मर्यादित ठेवणे हे सत्तेतील नेते सत्ताबळाचा फायदा घेत ठरवित असतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इंधनाचे दर कमी झाल्यावरदेखील वाढविलेल्या दराने अद्याप पेट्रोल, डिझेल विक्री केली जाते त्यामुळे जनसामान्यांपर्यंत जीवनावश्यक वस्तू पोहोचविताना जे दर द्यावे लागतात ते कुणालाही परवडणारे असू शकत नाहीत. अशा प्रकारे लोकांची नस आपल्या हाती ठेवत देवदेवतांना साकडे घालण्यात काही अर्थ असतो का?

**राजन पांजरी**,मुंबई

मो. नं.: ९८१९७००८१८

## निसर्ग संवर्धन करण्यासाठी व्यापक उपाययोजनांची गरज!

अनेक तज्ज्ञांनी वारंवार सह्याद्री पर्वतरांगा, पश्चिम घाट यासंदर्भात इशारे देणारे अहवाल दिले आहेत; पण याकडे दुर्लक्ष झाल्याने नैसर्गिक आपत्ती येत आहेत. आतातरी निसर्ग संरक्षण, संवर्धन करण्यासाठी व्यापक उपाययोजनांची गरज आहे. आता तात्पुरती मलमपट्टी उपयोगी नसून डोंगर, दऱ्या, नदीपात्र, तसेच एकंदरीतच निसर्ग संदर्भात उपाय केले, तरच भावी काळात दुर्घटना घडणार नाहीत.

**प्रफुल्लचंद्र काळे**

नाशिक, मो. नं.: ९२७३०४५७९४

**गुल्लेर**

## जयताळा




नरेंद्र इंगळे

9561226572


'कुठी चालली थैली भरुन?'

'मी चालली मायच्या घरी.'

'कायले चालली?'

'रोडगे जेवाले बलावलं माह्या मायनं.. नवस होता तिचा.'

'उठली की चालली मायच्या घरी.. तुले जरासक निमित्तच पाह्यजे..गेली की दोन दिवस येत नाहीस.. नवऱ्याले म्हना हातानं करत बस.'

'दहाच रुपये भाडं लागते मले.. अर्ध तिकीट हाय.'

'अर्ध हाय म्हनून हमेशाच जा लागते काय? चवदा तारीखले जाऊन आली तू लगनाले.'

'तुमाले पैसे मागून राह्यली काय मी? आता एकनाथभाऊ मले लाडक्या बईनचा पगार सुरू करुन राह्यले. तुमच्या भरोशावर नाही मी.'

'मले तं वाटते तुले पगारच भेटला नाही पाह्यजे.. तुहा अर्ज रद्द झाला पाह्यजे.'

'तुमाले काहून जयताळा सुटला?'

'जे बायको सतराखेप मायच्या घरी जाते, नवऱ्याले हातानं सैपाक कराले लावते तिले पगारच भेटला नाही पाह्यजे.'

'असे हलकट विचार आहेत तुमचे.. म्हनून मले दोन दिवस जाव वाटते.'

'बायको दोन दिवस गावाले गेली की घराचा ताल बिघडते.. तुह्या मयन्यातून चार चकरा असतात. कोनती बाई इतकी फिरते काय? बाया नवऱ्याले सोडत नाहीत.'

'त्यासाठी नवरा त्या ढंगाचा पाह्यजे.. तुम्ही दहा रुपये फेकून मारत ना.. कोनं देऊ केले त्याचाही खार सुटते तुमाले.'

'इतक्या बायाईले करोडो रुपये कुठून देईन सरकार? एक-दोन खेप देल्यावर ते योजना बंद पडते.'

'अशी कशी बंद पडते? मोर्चा काढतो आम्ही.. एकनाथभाऊ तुमच्यावानी दोन जबानचे नाहीत.'

'म्या कधी दोन जबान्या केल्या?'

'बँक भेटल्यावर मुंदी करून देतो म्हटलं होतं की नाही? केली काय?'

'ते पैसे किस्तकाळी अन् पेरन्यातच गेले.'

'यालेच दोन तोंड्या मानूस म्हनतात. जे बोललं ते केलं पाह्यजे. म्हनून मले राग येते तुमचा.'

'बरं आता वापस कधी येऊन राह्यली?'

'आता आठ दिवस येतच नाही.'

**धुमारे**

**वारी**

भावभक्तीचा गजर
मृदंग, टाळातून आला
वैष्णवांचा मेळा
वारकरी कुळातून आला
कुणी रानातून आला
कुणी माळातून आला
तुझा भोळा भक्त देवा
तळागाळातून आला
ऊन, पाऊस, विजांचा
मारा आभाळातून झाला
विठ्ठला तुझ्या दर्शनाला
तो मुलाबाळातून आला
पाहिले श्रीमुख टेकवला माथा
धन्य झाला जीव बा पंढरीनाथा
घेऊन निरोप सोडली पंढरी
दाटलाय कंठ हुरहुर उरी

**ॲड. अनंत खेळकर**

अकोला

**संवाद**

## प्रसिद्धीचा हव्यास..!

कित्येक उदाहरणात, कालदेखील आणखी एकाची भर पडली..मुंबईतील व्यवसायाने चार्टर्ड अकाऊंट असणारी आणि हौसेने ट्रॅव्हल ब्लॉगर असणारी, अन्वी कामदार ही तरुणी रायगडमधील एका सह्याद्री कड्यावरून रील्स बनवताना दरीत कोसळली आणि दुर्दैवाने मृत्यू पावली..! आत्ता सध्या मागची मोजकीच काही वर्षे झाली, या देशातील खूप मोठ्या तरुण वर्गाला या रील्सचे प्रचंड वेड लागलेले पाहायला मिळत आहे..जो तो, हातात मोबाईल घेऊन होईल तो आटापिटा करत पटकन प्रसिद्धी आणि पैसा मिळविण्याच्या मार्गावर जोर लावून धावू लागला आहे..! पण... आपले फॉलोअर्स वाढवणे, त्यातून प्रसिद्धी मिळवणे, याचा हव्यास मात्र वाढत चालला आहे..!यामागे शोधले तर एक खोलवर मूळ दिसू शकेल.. ते म्हणजे पैसा आणि एक सेलिब्रिटी मान मिळवण्याचा हव्यास, अट्टाहास..!

आपल्या देशात कितीही शिकलेली व्यक्ती असो, की न शिकलेली मंडळी असो, 'आपल्याभोवती प्रसिद्धीचे वलय असावं' याचा एक छुपा हव्यास प्रत्येकात दडलेला आहे.. त्यामागे आपले बॉलिवूड स्टार्स आणि राजकारणी मंडळी यांचा प्रचंड मोठा वाटा आहे.. राईभर कर्तृत्वाच्या मनाने यांना पैसा आणि प्रसिद्धी दोन्ही डोंगर भर मिळताना आपण पाहतो..पण आता प्रत्येकाला या दोन क्षेत्रांत प्रवेश, संधी मिळणे शक्य नाही होत.. तर मग काय करायचे..!? तर, मोबाईल...!! मोबाईलमधून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रत्येकाच्या हातात एक सोपा सहज मार्ग उपलब्ध झाला आहे..यातून रील्स स्टार पावसाळी भूछत्र्यांसारखे जन्म घेऊ लागले.. तसेच वेगवेगळे ब्लॉगर्सदेखील..!बेरोजगारीमुळे तरुण मंडळी जास्त प्रमाणात या सोप्या (!?) वाटणाऱ्या मार्गाकडे वळताना दिसत आहेत..पण हळूहळू हा अतिहव्यास कित्येक जणांची माती करत असलेली कित्येक उदाहरणे रोज आपण पाहतो, पण पुढच्यास ठेच लागल्यावरदेखील आपले मागचे शहाणे होत नाहीत, हे फार मोठे दुर्दैव आणि शोकांतिका आहे..! या मोबाईलने जितका फायदा केला, त्याहून अधिक नुकसान केले आहे, करत आहे..! आणि विशेष दुखणे या गोष्टीचे आहे की, आजकालच्या मुलांना आई- वडील आणि इतर अनुभवी व्यक्तींचे सल्ले ऐकणे म्हणजे त्यांच्या स्वैराचारावर, ज्याला ते त्यांचे तथाकथित 'स्वातंत्र्य' म्हणतात, त्यावर गदा आणणे वाटते..! त्यांना लाईफ जगणे म्हणजे अति काहीतरी वेगळे करणे, एन्जॉयमेन्ट म्हणजे सामाजिक नीती- नियम, कायदे धुडकावून लावत विपरित वागणे हीच व्याख्या वाटते..!आणि विशेष म्हणजे, या बरबाद होत जाणाऱ्या तरुण पिढीकडे राजकारणी मंडळी सोयीस्करपणे दुर्लक्ष करते आहे, हे वेगळे सांगायला नकोच..!! हातातील या वितभर गॅझेटच्या माध्यमातून असंख्य बेरोजगार तरुण-तरुणी वेगवेगळ्या प्रलोभनांना बळी पडत व्यसने, गुन्हेगारी आणि पैसा प्रसिद्धीच्या शॉर्टकट मार्गाकडे धाव घेत आहेत..वेळीच पालक, सर्व समाज आणि सरकारने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, कारण ही पिढी देशाचे पुढचे मनुष्यबळ आहे. यांची ही अशी गत होत असेल, तर देशाचे भवितव्य नक्कीच अंधारमय असेल.

**डॉ.अंजली मुळके,**

मो. नं.: ८८७९०६३१३२



## गडचिरोलीत २००० पासून...

# २९९ नक्षलवादी ठार!

लोकनाथ काळमेघ

**अकोला** : गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांविरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई बुधवारी ( १७ जुलै २०२४ला) करण्यात पोलिसांना यश आले आहे. नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये झालेल्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाले. विशेष म्हणजे या चकमकीत २५ लाखांहून अधिक बक्षीस असलेला नक्षलवादी डीव्हीसीएम लक्ष्मण मारला गेला आहे. गडचिरोलीत २००० पासून २९९ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

### आजपर्यंत गडचिरोलीत झालेल्या कारवाया

■ १९ फेब्रुवारी २०२४ - महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर ३६ लाखांचे रोख बक्षीस असलेले चार नक्षल कमांडर मारले गेले. ■ १३ मार्च २०२१- गडचिरोली जिल्ह्यातील ग्यारापट्टीच्या जंगलात २६ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला होता. ■ २१ मे २०२१- गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तहसीलमधील कोटमी जंगलात सात महिलांसह १३ नक्षलवाद्यांना यमसदनी पाठवण्यात यश आले. ■ २८ एप्रिल २०२१- एटापल्ली तालुक्यातील गट्टा-जांबिया जंगलात दोन नक्षलवादी ठार झाले. ■ २८ मार्च २०२१- कुरखेडा तहसीलच्या खोब्रामेंढा भागात एका उच्चपदस्थ कार्यकर्त्यासह पाच नक्षलवाद्यांचा खात्मा. ■ १८ सप्टेंबर २०२०- धानोरा तालुका (महसूल उपविभाग) अंतर्गत कोसमी-किसनेली जंगलात तीन महिला कॅडरसह सीपीआय - माओवादीचे पाच कार्यकर्ते ठार. ■ २ मे २०२०- जारावंडी गावाजवळील पेंढ्रा विभागातील सिनभट्टीच्या जंगलात भारतीय कम्युनिस्ट पक्ष-माओवादीची वरिष्ठ महिला 'कमांडर' ठार. ■ १५ सप्टेंबर २०१९ - नरकसा जंगल परिसरात सीपीआय - माओवादीचे दोन कार्यकर्ते ठार, पाच जखमी. ■ २७ एप्रिल २०१९ - भामरागड उपविभागातील कोटी गावाजवळ १.६ दशलक्ष बक्षीस असलेल्या एक वरिष्ठ कॅडर गोळ्या घालून ठार. ■ २८ फेब्रुवारी २०१९ - पाच महिलांसह सीपीआय-माओवादीचे आठ कार्यकर्ते ठार. ■ २२ एप्रिल २०१८ - १.०६ कोटी रुपयांचे एकत्रित बक्षीस असलेले ३७ कट्टर नक्षलवादी ठार. ■ ६ डिसेंबर २०१७ - सिरोंचा तालुक्यातील झिंगनूर चौकीच्या उत्तरेला सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या कल्लेड गावातील जंगलात पाच महिलांसह सात नक्षलवादी ठार. ■ १८ फेब्रुवारी २०१४ - अलीटोला गावाजवळ सात सीपीआय-नक्षलवादी कॅडर ठार.

# वाहनाच्या काचेवर फास्टॅग नसल्यास भरावा लागणार दुप्पट टोल!

**दिल्ली** : सध्या महामार्गावर ये-जा करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी टोल भरावा लागत आहे. एकाच वेळी असंख्य वाहने येत असल्याने टोल प्लाझावर वाहनांच्या रांगांच्या रांगा लागत होत्या. त्यामुळे फास्टॅग ही प्रणाली आणण्यात आली.

त्यानुसार बहुतांश वाहनांवर आपल्याला फास्टॅग पाहायला मिळतो. मात्र, अजूनही असे वाहनचालक आहेत त्यांच्या वाहनाच्या काचेवर फास्टॅग नाही.

पण आता जर वाहनाच्या काचेवर फास्टॅग नसेल तर तुम्हाला मोठा भुर्दंड सहन करावा लागणार आहे. वाहनाच्या काचेवर फास्टॅग नसल्यास दुप्पट टोल आकारण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

याविषयी राष्ट्रीय महामार्ग



प्राधिकरणाकडून मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. टोल संकलन करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. समोरच्या काचेवर फास्टॅग स्टिकर नसेल तर अशा वाहनचालकांकडून दुप्पट टोल वसूल करावा असे त्यात सांगण्यात आले आहे. एनएचएआय'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, काही जण मुद्दामहून वाहनांच्या समोरील काचेवर फास्टॅग स्टिकर चिकटवत नाहीत. त्यामुळे टोल नाक्यांवर विनाकारण इतर वाहनांना विलंब होतो.

# पाकिस्तानात अल-कायदाच्या म्होरक्याला अटक

वृत्तसंस्था

**इस्लामाबाद** : पाकिस्तानात दहशतवादी विरोधी मोठी कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानी दहशतवादविरोधी अधिकाऱ्यांनी अल-कायदा या दहशतवादी संघटनेच्या म्होरक्याला अटक केली आहे. अमीन उल हक याला पाकिस्तानमध्ये अटक करण्यात आली आहे. अमीन उल हक हा अल-कायदा या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या असून त्याचा संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिबंध यादीत समावेश आहे. शिवाय अमीन हा ९/११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड मृत ओसामा बिन लादेन याचा जवळचा सहकारीही होता. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील दहशतवादविरोधी विभागाने अमीन उल हकच्या विरोधात कायदेशीर खटला नोंदवला आहे. पंजाबमधील महत्त्वाच्या प्रतिष्ठानांची तोडफोड करण्याची योजना आखल्याचा आरोप करत त्याला अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानकडून अनेक वर्षांनंतर अल-कायदाच्या सदस्याला अटक करण्यात आली आहे. 'दहशतवादाविरुद्धच्या लढाईत महत्त्वपूर्ण यश मिळवले असून सीटीडीने गुप्तचर संस्थांच्या सहकार्याने अल-कायदाचा वरिष्ठ नेता अमीन उल हक याला यशस्वीरीत्या पकडले,' असे विभागाच्या प्रवक्त्याने निवेदनात म्हटले आहे.

# भावा-बहिणींमध्ये भांडण लावण्याचा सरकारचा प्रयत्न!

प्रतिनिधी

**अमरावती** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. या योजनेंतर्गत राज्यातील महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये मिळणार आहेत. मात्र, या योजनेच्या माध्यमातून राज्य सरकार राज्यातील महिलांची दिशाभूल करत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जाहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनीही शिंदे सरकारवर निशाला साधला आहे.

राज्यातील महिलांसाठी सरकारने लाडकी बहीण योजना आणून पंधराशे रुपयात महिलांची बोळवण राज्य सरकारने केली आहे. तर, सुशिक्षित तरुणांना मात्र सहा ते बारा हजार रुपये दिले जाणार आहेत. निवडणुकांपूर्वी महिलांची फसवणूक करण्यापेक्षा त्यांना सन्मानजनक रक्कम द्यावी,' अशी त्यांनी मागणी केली आहे. राज्य सरकारने राज्यातील महिलांसाठी नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा पंधराशे रुपये देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. तर आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्यातील सुशिक्षित तरुणांना कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत दरमहा सहा ते बारा हजार रुपये देण्यात येणार आहेत. बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सहा हजार रुपये कार्य प्रशिक्षणा दरम्यान तर पदविका झालेल्या तरुणांना आठ हजार

### लाडकी बहीण योजनेवरून यशोमती ठाकूर बरसल्या



आणि पदवीधर तरुणांना कार्य प्रशिक्षणादरम्यान दहा हजार रुपये देण्यात येणार आहेत', असे यशोमती ठाकूर म्हणाल्या. पुढे यशोमती ठाकूर म्हणाल्या की, 'एकीकडे लाडक्या भावाला दहा हजार रुपये देण्याचा सरकारने निर्णय घेतला आणि दुसरीकडे लाडक्या बहिणीची मात्र दीड हजार रुपयात फसवणूक केली जात आहे. यामध्ये लाडक्या भावा-बहिणींमध्येच भांडण लावायचा सरकारचा प्रयत्न असल्याचा दिसत आहे. दरम्यान राज्यातील सुशिक्षित महिलांनाही सरकारने लाडक्या भावाच्या योजनेप्रमाणे सन्मानजनक रक्कम दिली पाहिजे. किंवा राज्यातील महिलांना सरसकट पाच हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम सरकारने देऊन महिलांचा सन्मान करावा. राज्यातील महिला भगिनींची जर सरकारला खरोखरच काळजी असेल तर त्यांनी महिलांची दीड हजार रुपयात फसवणूक न करता त्यांना किमान पाच हजार रुपये सन्मानपूर्वक द्यावेत.', असेही ठाकूर म्हणाल्या.

# एअर इंडियाचे विमान अमेरिकेऐवजी थेट रशियात झाले लँड..

वृत्तसंस्था

**दिल्ली** : एअर इंडियाच्या एका विमानातील प्रवाशांना काही अनपेक्षित अनुभव आला आहे. दिल्लीहून अमेरिकेतील सॅन फ्रॅन्सिस्कोला चाललेल्या एअर इंडियाच्या विमानाला गुरूवारी रशियाच्या क्रास्नोयार्स्क आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरविण्यात आले.

एअर इंडियाने एक्स या सोशल मीडिया साईटवर सविस्तर पोस्ट टाकून या घटनेचे कारण सांगितले. दिल्लीहून निघालले एअर इंडियाचे विमान अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को इथे लँड होणे अपेक्षित होते. पण, गुरुवारी विमानात काही तांत्रिक त्रुटी आढळल्यामुळं ते रशियातील क्रास्नोयार्स्क आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँड करण्यात आले. प्रवाशांची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या साथीने एअर इंडिया काम करत असल्याचे एअर इंडियाकडून सांगण्यात आले. या विमानात २२५ प्रवासी आणि १९ क्रू मेंबर्स प्रवास करत होते. रशियात विमान लँड झाल्यानंतर त्या सर्वांना तातडीने टर्मिनल बिल्डींमध्ये पुढील प्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.

# नैसर्गिक औषधी वनस्पती 'छोटी कटेली' क्षयरोगाचा प्रभावी

### पतंजलीचे संशोधन 'फ्रंटियर्स इन मायक्रोबायोलॉजी' या जगप्रसिद्ध पीअर-रिव्ह्यूड जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.

- क्षयरोग रोखण्यासाठी जगभरात अनेक सरकारी उपक्रम दीर्घकाळापासून प्रयत्नशील आहेत - आचार्य बाळकृष्ण
- बरा होणाऱ्या आणि असाध्य रोगांपासून लोकांना मुक्त करण्यासाठी पतंजली पूर्णपणे कटिबद्ध आहे - आचार्य बाळकृष्ण

**राष्ट्रीय/हरिद्वार, १७ जुलै** : क्षयरोग हा जीवाणूंमुळे होतो (मायकोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस) व तो बहुतेकदा फुप्फुसांवर परिणाम करतो. फुप्फुसाचा टीबी असलेले लोक खोकतात, शिंकतात किंवा थुंकतात तेव्हा टीबी हवेतून पसरतो. एखाद्या व्यक्तीला संसर्ग होण्यासाठी फक्त काही जंतू श्वास घेणे आवश्यक आहे.

डब्ल्यूएचओच्या मते, २०२२ मध्ये जगभरात १ कोटी पेक्षा जास्त लोक या आजाराने बाधित झाले होते. हा रोग टाळता येण्याजोगा आणि बरा करता येण्याजोगा असूनही, दरवर्षी अनेक लोक क्षयरोगाने मरतात - ज्यामुळे ते जगातील शीर्ष संसर्गजन्य मारकांपैकी एक बनले आहे. जवळजवळ प्रत्येक देशात आणि भारतात, क्षयरोगाचा सामना करण्यासाठी १९६२ पासून सरकारी उपक्रम राबविला जात आहे, रुग्णांना मोफत औषधे पुरवली जात आहेत.

यावेळी, आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, सध्याच्या उपचार पद्धतींमध्ये क्षयरोधक औषधांची मर्यादित जैविक उपलब्धता आणि एकल-किंवा बहु-औषध प्रतिरोधक विकसित करण्यासाठी जीवाणूंची प्रवृत्ती यांचा समावेश आहे तसेच क्षयविरोधी औषधांचा दीर्घ उपचार कालावधी औषध-संबंधित हेपेटोटोक्सिसिटीला प्रेरित करतो. या सर्वांमुळे हे स्पष्ट होते की नवीन टीबी औषधांची किंवा सहायक उपचारांची नितांत गरज आहे जी विद्यमान उपचार पद्धती अधिक प्रभावी बनवते.

क्षयरोग (टीबी) उपचारांसाठी हर्बल औषधे विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल करताना, पतंजलीच्या अलीकडील अभ्यासात सोलॅनम व्हर्जिनिअम एक्स्ट्रॅक्ट (एसव्हीई) किंवा 'छोटी कटेली'ची क्षयरोधी थेरपीची क्षमता अधोरेखित झाली आहे. हे संशोधन हर्बल थेरपीज विकसित करण्याच्या उद्दिष्टाचा एक भाग आहे जे एकटे उभे राहू शकतात किंवा विद्यमान टीबी-विरोधी औषधांना पूरक ठरू शकतात, कृतीची परिभाषित यंत्रणा व वनौषधी-औषध समन्वयासह.

सध्याच्या अभ्यासात मायकोबॅक्टेरियम स्मेग्मॅटिस, mc2 155, मायकोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस (एमटीबी च्या तपासणीसाठी एक मॉडेल प्रणाली, एसव्हीई च्या जैविक क्रियाकलापांची चाचणी घेण्यात आली आहे, असे दिसून आले आहे की एसव्हीई सह उपचार केलेल्या जीवाणूंची वाढ आणि व्यवहार्यता कमी होते, जे अर्कचे क्षय-विरोधी प्रभाव दर्शवते.

एसईएम व टीएलसी-आधारित शास्त्रीय चयापचय पद्धतींसारख्या प्रगत तंत्रांनी असे दिसून आले की एसव्हीई उपचाराने बॅक्टेरियाच्या पेशींच्या मायक्रोआर्किटेक्चरमध्ये बदल केला व बॅक्टेरियाच्या सेल भिंतीच्या अखंडतेशी तडजोड केली. अभ्यासात पुढे यूपीएलसी/क्यूटीओएफ-एमएस वापरून लक्ष्यित चयापचय पद्धती वापरून जिवाणूंच्या जटिल जैविक मॅट्रिक्स मध्ये इंट्रा सेल्युलर आयसोनियाझिड (आयएनएच) शोधून त्याचे प्रमाण निश्चित करण्यात आले ज्यामुळे एसव्हीईने आधुनिक टीबी औषध आयसोनियाझिड (आयएनएच) ची जैवउपलब्धता वाढवली, जिवाणूंचे प्रमाण वाढवले. औषधाची संवेदनशीलता व त्याची कार्यक्षमता सुधारणे.

सेल लाइन-आधारित संसर्ग प्रयोगांमध्ये, एसव्हीई आणि आयएनएच च्या संयोगाने बॅक्टेरियाच्या मृत्यूचे प्रमाण लक्षणीय वाढले. याव्यतिरिक्त, एसव्हीइ मानवी यकृत पेशींमध्ये हेपॅटोप्रोटेक्टिव्ह प्रभाव प्रदर्शित केला.

आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, पतंजली हे संशोधन 'फ्रंटियर्स इन मायक्रोबायोलॉजी' या प्रख्यात पीअर-रिव्ह्यूड जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे हे जाहीर करताना आनंद होत आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे छोटी काटेली अर्काच्या अँटी-मायकोबॅक्टेरियल गुणधर्मांवरील भविष्यातील अभ्यासाचा पाया घातला गेला आहे, ज्यामुळे क्षयरोगाविरूद्धच्या लढ्यात नवीन आशा निर्माण झाली आहे. पतंजलीला या महत्त्वपूर्ण संशोधनाची सुरुवात केल्याबद्दल सन्मान वाटतो. आयुर्वेदाच्या ज्ञानाचा आणि विज्ञानाचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी व बरा होणाऱ्या आणि असाध्य रोगांपासून लोकांना मुक्त करण्यासाठी संस्था वचनबद्ध आहे. पतंजलीमधील सर्व शास्त्रज्ञ आणि कर्मचारी आयुर्वेदाच्या सुवर्ण युगाचे पुनरुज्जीवन करण्याच्या व भारताचा प्राचीन वारसा जगभरात प्रतिध्वनित व्हावा हे सुनिश्चित करण्याच्या ध्येयाने प्रेरित आहेत.



**नवी दिल्ली : भारतीय नौदलाला लवकरच आणखी हायटेक युद्धनौका मिळू शकतात. भारतीय नौदलाला बळकट करण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत नवीन युद्धनौका बांधण्यासाठी लवकरच ७० हजार कोटी रुपयांच्या कराराला मंजुरी देण्याची शक्यता आहे.**

# भीक नको, नोकऱ्या द्या! - उद्धव ठाकरे

**मुंबई** : लाडकी बहीण योजनेनंतर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपुरातून लाडका भाऊ योजनेची घोषणा केली. मात्र, यावरून ठाकरेंच्या शिवसेनेने सरकारवर तोफ डागली. ठाकरे गटाने मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून स्टायपेंडची भीक नको, तर हक्काच्या नोकऱ्या द्या, अशी मागणी करत शिंदे सरकारवर निशाणा साधला आहे.

देशात बेरोजगारीच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे, यासाठी मोदी सरकार जबाबदार आहे. बेरोजगारीला कंटाळून देशात दर



तासाला दोन आत्महत्या होत आहेत. नुकताच कर्नाटक सरकारने स्थानिकांना नोकऱ्या देण्याबाबत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. कर्नाटक मंत्रिमंडळाने सर्व खाजगी उद्योगांमध्ये ५० ते ७० टक्के जागा स्थानिकांसाठी राखीव ठेवण्याचे विधेयक मंजूर केले. कर्नाटक सरकारने घेतलेला निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे, असे सामनाच्या अग्रलेखातून म्हटले गेले.

# इर्शाळवाडी दुर्घटनेला एक वर्ष पूर्ण

वृत्तसंस्था

**रायगड** : इर्शाळवाडी येथे दरड कोसळून भीषण दुर्घटना घडली होती. त्या घटनेला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. दुर्घटनेत उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबीयांना आजही हक्काची घरे मिळाली नाहीत. या महिन्याच्या अखेरीस घरांचे बांधकाम पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथील कुटुंबासाठी १९ जुलै २०२३ हा दिवस अत्यंत दुःखद ठरला. त्या घटनेला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. इर्शाळवाडी साखरझोपेत असताना थरकाप उडवणारी घटना घडली. या रात्री अकराच्या सुमारास अचानक दरड कोसळसी. यात ८४ लोकांचा मृत्यू झाला.

**बचाव कार्यात कोणतेही मशीन वापरण्यात आले नाही**

रायगडच्या खालापूर तहसीलमधील डोंगरमाथ्यावर असलेल्या या इर्शालवाडीला जाण्यासाठी कोणतेही पक्के रस्ते नाहीत. रस्त्यापासून ते किमान एक तासाच्या अंतरावर हे गाव आहे. बचाव पथके ऑपरेशनसाठी उत्खनन किंवा जेसीबी वापरण्यास सक्षम नव्हती. त्यामुळे बचाव पथकाला स्वतःहून ढिगारा खोदून काढावा लागला.

**अनेक कुटुंबे आजही हक्काच्या निवाऱ्यापासून वंचित**

४३ कुटुंबांतील २२८ रहिवाशांपैकी २३ मुलांसह केवळ १४४ जण या घटनेत वाचले. आजही या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या ५७ जणांचे मृतदेह टेकडीच्या भूभागात पुरलेले आहेत. एवढंच नाही तर, उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबीयांना आजही हक्काची घरं मिळाली नाहीत.

**७,००० लोकांचे स्थलांतर**

इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर रायगड जिल्ह्यातील १०३ भूस्खलनप्रवण गावांमधून २,०४० कुटुंबांतील सुमारे ७,००० लोकांना ५१ छावण्यांमध्ये हलवण्यात आलं. १९८० पासून, महाराष्ट्रातील रायगड आणि कोकणात पावसाळ्यात मोठ्या भूस्खलनाच्या दुर्घटना घडल्या आहेत.

# अमूल बटर मिल्कमध्ये आढळले तरी काय..?

### ग्राहकांमध्ये संताप..

वृत्तसंस्था

**कानपूर** : ग्राहकाने ऑनलाइन ऑर्डर केलेल्या अमूल बटर मिल्कमध्ये आळ्या आढळल्याची घटना उघडकीस आली.

अमूल बटर मिल्क पिणाऱ्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. ग्राहकाने ऑनलाइन ऑर्डर केलेल्या अमूल बटर मिल्कमध्ये आळ्या आढळल्याचा प्रकार समोर आला. अमूल बटर मिल्कचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून नेटकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हा व्हिडिओ पाहून ग्राहक ऑनलाइन बटर मिल्क ऑर्डर करण्यापूर्वी १० वेळा विचार करतील. गजेंद्र यादव नावाच्या ट्विटर हँडलवरून अमूल बटर मिल्कसंदर्भात महत्त्वाचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये युजरने लिहिले की, 'मी अमूल बटर मिल्कचा मोठा बॉक्स ऑर्डर केला. परंतु, बॉक्स उघडताच त्यामध्ये पांढऱ्या रंगाच्या आळ्या रेंगाळताना दिसल्या.

# अंत्यविधीतील गर्दीत भरधाव ट्रक घुसला!

### तीन ठार ; महामार्गावर रक्ताचा सडा

वृत्तसंस्था...

**पुणे** : गुळंचवाडी येथून अंत्यविधी उरकून काही मंडळी घरी निघाली होती. यावेळी नगरकडून येणारा भरधाव ट्रक थेट गर्दीत शिरला होता. या दरम्यान या ट्रकने अनेक चारचाकी आणि दुचाकीला धडक दिली.

अंत्यविधी उरकून घरी निघालेल्या नागरीकांच्या गर्दीत भरधाव ट्रक घुसल्याची घटना घडली आहे. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून अनेकजण



जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. हा अपघात नगर-कल्याण महामार्गावरील गुळंचवाडी (ता.जुन्नर) येथे आज (१९ जुलै) सकाळी साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. या घटनेनंतर संतप्त नागरीकांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन केले होते.

# बांगलादेशात आत्तापर्यंत ३९ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली** : बांगलादेशात सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणावरुन आठवडाभरापासून सुरू असलेले आंदोलन आता उग्र बनले आहे. गुरुवारी संध्याकाळी आंदोलकांनी बांगलादेशच्या मुख्य सरकारी टीव्ही चॅनल बीटीव्हीच्या मुख्यालयाला आग लावली. तर या आरक्षणाच्या विरोधात झालेल्या हिंसाचारात आत्तापर्यंत ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २५०० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहे.

### आरक्षणाविरोधात हिंसाचार



आंदोलकांनी बसेस सोबत खासगी वाहनांची देखील जाळपोळ केली आहे.

एएफपीच्याने दिलेल्या वृत्तानुसार, गुरुवारी सायंकाळी शेकडो आंदोलकांनी बीटीव्ही कार्यालयाच्या कॅम्पसमध्ये प्रवेश केला आणि ६० हून अधिक वाहने जाळली.

# १०० आमदार आणा, सरकार बनवा!

### भाजपामध्ये अंतर्गत 'धुसफुस'

वृत्तसंस्था

**लखनऊ** : उत्तर प्रदेश भाजपमध्ये अंतर्गत धुसफुस सुरू झाल्याची अटकळ बांधली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर सपाचे नेते अखिलेश यादव यांनी गुरुवारी राज्यातील सत्तारूढ पक्षासाठी 'एक्स'वर एक 'मान्सून ऑफर' दिल्याने तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

'मान्सून ऑफर-१०० आमदार घेऊन या, सरकार स्थापन करा', असे अखिलेश यादव यांनी 'एक्स'वर म्हटले आहे. यादव यांनी या पोस्टमध्ये कोणाचाही नामोल्लेख केला नसला तरी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर जे नाराज आहेत आणि ज्यांची पक्षांतर करण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठीच ही पोस्ट असल्याचे सपातीलच एका ज्येष्ठ नेत्याचे म्हणणे आहे. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत २०२२ मध्ये सपाचे १११ उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपच्या १०० असंतुष्ट आमदारांचा आम्हाला जर पाठिंबा मिळाला तर आम्ही राज्यात सहज सरकार स्थापन करू शकतो, असेही सपाचा हा नेता म्हणाला.

# पिंपरखेडमध्ये तीस वर्षांपासून ज्ञानयज्ञ!

प्रा. प्रकाश खळगे यांचे उल्लेखनिय कार्य!
• वाचनालयाच्या माध्यमांतून विविध कार्यक्रम
• शिक्षणाचे महत्व पटवून देत जनजागृती
• सामाजिक स्तरातून होतेय सर्वत्र कौतूक

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

पिंपरखेड येथील रहिवासी असलेले लोकमान्य टिळक महाविद्यालयातील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी मागील २५ ३० वर्षापासून पिंपरखेड गावामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाच्या माध्यमातून त्यांनी या गावांमध्ये अनेक सामाजिक सेवा उपलब्ध केलेल्या आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञान यज्ञाच्या माध्यमातून पिंपरखेड गाव प्रकाशमान झालेले आहे. आता या गावातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे काम चालू करून गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे त्याचबरोबर ग्रंथ वाचन, बक्षीस वितरण, ग्रंथ प्रदर्शन यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक २१ जुलै रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रा. प्रकाश खळगे सर यांच्यासह वाचनालयाच्या अध्यक्षा विशाखा खळगे,






ग्रंथपाल सौ पल्लवी कोरडे, सौ. शीलाताई उजगरे यांनी केले आहे.

पिंपरखेड सारख्या ग्रामीण भागात ज्यावेळी शिक्षणाची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती त्याकाळी प्राध्यापक प्रकाश खळगे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत उच्च शिक्षण घेतलं. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब असतानाही प्रकाश खळगे सर यांनी संघर्ष करत केवळ स्वतः शिक्षण घेतलेच नाही तर गावातील इतर गरजूंना शिक्षण देण्यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. त्यांच्या जीवनामध्ये पान २ वर...

### सामाजिक कार्यातून पत्नीच्या स्मृतींना उजाळा

प्रा. प्रकाश खळगे सर यांच्या मागील २५ ३० वर्षाच्या सामाजिक कार्यामध्ये त्यांच्या पत्नी सौ. वंदना प्रकाश खळगे यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी आपल्या पतीला अडचणीच्या काळामध्ये खूप मोठा धीर दिला. त्यामुळे प्रकाश खळगे सर हे समाज कार्याला वेळ देऊ शकले. आणि कुटुंबातील संघर्षाचा काळ संपल्यानंतर वंदनाताई यांचे अकाली निधन झालं. त्यांच्या निधनामुळे प्रकाश खळगे सर हे पार खचून गेले होते. मात्र सामाजिक कार्याचा वसा आपण पुढे नेणे गरजेचे आहे याचं भान ठेवून त्यांनी आपल्या पत्नीच्या आठवणीला उजाळा देत सामाजिक कार्य चालूच ठेवले आहे.

## लाचेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता!

निर्णय : केज सत्र न्यायालयाने दिला निकाल



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज सुकळी येथील रामरतन गिरी यांनी वारसाचा फ`र मंजुर करण्यासाठी साळेगावचे तलाठी आनिल कुलकर्णी व त्यांचे राईटर तुळशीराम मुकदम यांच्याशी संपर्क केला आसता त्यांनी पैसेची मागणी केली आसता दिनांक १६/३/२०१६ रोजी बीड येथील लाचलुचपत कार्यालयाशी संपर्क केला व तलाठी व त्यांचे राईटर वारसाचा फेर मंजुर करण्यासाठी २२०० रुपये मागत आसल्याची तक्रार दाखल केली आसता लाच लुचपत प्रतिबंध खात्याकडुन सापळा टाकण्यात आला आसता दिनांक १७/३/२०१६रोजी संबधीत तलाठी व राईटर यांनी लाचेची रक्कम मागितली व ती स्विकारली बाबत केज पोलीस स्टेशन येथे लाच लुचपत कायद्याअंतर्गत गु, र, नं, ७३/१६ या नुसार कलम ७, ८, १२, १३, १३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला त्यानंतर जिल्हा सत्र न्यायालय अंबाजोगाई येथे सदरील आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल करण्यात आले व २०२३ मधे पुढील सुनावणी साठी जिल्हा सत्र न्यायालय केज येथे सदरील प्रकरण वर्ग पान २ वर...

## अनागोंदी कारभारा विरोधात बैठा सत्याग्रह

प्रश्नचिन्ह : उपोषणकर्ते क्षेत्रे यांना न्याय मिळणार का ?



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

अहमदनगर जिल्हा परिषदेतील अनागोंदी कारभाराविरोधात बैठा सत्याग्रह आंदोलनाचा आज पाचवा दिवसा असुन ही प्रशासन उदासीन आहे अ नगर जिल्हा परिषदेत शिक्षण विभागात त्या विभागाचे शिक्षणाधिकारी यांच्यावर ट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल आहे व तो गुन्हा एका महिला शिक्षिकेने दाखल केलेला आहे प्रचलित कायद्यानुसार गुन्हा दाखल झाल्यावर लगेच निलंबन व नंतर चौकशी परंतु अहमदनगर जिल्हा परिषदेने त्या शिक्षणाधिकाऱ्यांचे आजपर्यंत निलंबन केलेले नाही किंवा त्यांच्या सहकाऱ्यांचे निलंबन केलेले नाही मग माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांना का वाचवत आहेत हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ताबडतोब शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना निलंबित करावे व तसेच करता येत नसेल तर योग्य ठिकाणी निलंबनाची शिफारस करावी .

पाथरवाला तालुका नेवासा येथील शिरसगाव प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत उपकेंद्र पाथरवाला या ठिकाणी २०१६ ते २०२२ पर्यंत फक्त आठ जन्म मृत्यूची नोंद आहे मग या सहा वर्षात या उपकेंद्रावर कोणत्याही अधिकाऱ्याने भेट का दिली नाही तेथील कर्मचारी सहा वर्षे काय काम करत होते किंवा त्या ठिकाणी निधी कसा खर्च केला गेला तेथील आरोग्य सेविका सुपरवायझर किंवा त्यांचे कर्मचारी माननीय वैद्यकीय अधिकारी यांनी अशा प्रकरणाकडे का दुर्लक्ष केले? की जाणून-बुजून या राष्ट्रीय कर्तव्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आजपर्यंत कोणीच काही का बोलले नाही किंवा त्यांना हे उपकेंद्रच माहीत नव्हते अशी अनेक प्रश्न आज या ठिकाणी निर्माण होत आहेत आणि म्हणून माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संबंधित अधिकाऱ्यावर ताबडतोब निलंबनाची कारवाई करावी. खरवंडी तालुका नेवासा येथील तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी तर कहरच केला आहे. कोणाचीही मागणी नसताना मासिक सभेची परवानगी नसताना ग्रामसभेची परवानगी नसताना सार्वजनिक चावडी महार लोकांची या वास्तूवर बुलडोजर फिरवून त्या ठिकाणी सुसज्ज अशी इमारत बांधून ती मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावावर देखील केली. ही फार गंभीर बाब असून याकडे देखील तत्कालीन गटविकास अधिकारी व तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अहमदनगर यांनी पाठ फिरवली असून याप्रकरणी सदर ग्रामविकास अधिकारी यांना पाठीशी घालण्याचे काम या ठिकाणी झालेले आहे म्हणून तत्कालीन ग्रामविकास अधिकारी खरवंडी तालुका नेवासा यांना देखील तात्काळ निलंबित करण्यात यावे.

तिसगाव तालुका पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला काही दिवसापूर्वी आग लागली होती पान २ वर...

## केजमध्ये अवैध धंद्याचा सुळसुळाट!

चर्चा : पोलिस मात्र हफ्ते घेऊन सुस्त का?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील पोलिस स्टेशन हे बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पोलिस स्टेशन असुन या पोलिस स्टेशनच्या हद्दीत ५९ गावांचा समावेश असुन त्याच बरोबर सर्वात मोठी हद्द असलेले पोलिस ठाणे म्हणुन यांची ख्याती आहे.त्यामुळे याठिकाणी बदली करून घेण्यासाठी अधिकारी वाटेल ती रक्कम देण्यासाठी तयार असतात अशा या पोलिस स्टेशनच्या हद्दीत गेल्या महिन्यापासुन अवैध धंद्याचा सुळसुळाट वाढला आहे मात्र याकडे पोलिसांचे अर्थपुर्ण दुर्लक्ष होत आहे. युसूफवडगांव पोलिस ठाणे हद्दीत गेल्या काही दिवसांपासून अवैध धंदे तेजीत असुन हद्दीत सर्वत्र ठिकाणी अवैध धंद्याचा सुळसुळाट वाढला आहे.गावोगाव मटका बुकी, अवैध गुटखा विक्री व पार्सल तसेच अवैध दारू विक्री व दारू पार्सल मोठ्या प्रमाणावर होत आहे.यामुळे मटक्या व दारूमुळे कित्येकांच्या संसाराची राखरांगोळी होत आहे.तरूण मुलांना यांचे व्यसन लागुन ते व्यसनाधीनतेच्या आहारी गेले आहेत.यामुळे युवी पीढी बरबाद होण्याच्या मार्गावर आहे पण याचे मात्र पोलिस प्रशासनाला पान २ वर...

## केजमध्ये गजापुर घटनेच्या निषेधार्थ बंद!

आक्रमक:मुस्लिम समाज आंदोलनाला पाठिंबा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोल्हापुर जिल्ह्यातील गजापुर (विशाळगड) येथील हल्ल्या प्रकरणी सर्व स्तरातुन निषेध होत आहे. आज या घटनेच्या निषेधार्थ केज शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. सर्व व्यापार्यांनी आप आपले व्यवहार बंद ठेवले होते. दुपारी २ वाजता दर्गाह या ठिकाणाहुन तहसिल कार्यालयावर मुस्लिम समाजाचा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाला शहरातील मुस्लिमांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रकरणी तहसिलदार यांना आपल्या मागण्याचे निवेदन देण्यात आले. गेल्या काही दिवसापुर्वी विशाळगड गजापुर येथे वाद विवाद निर्माण करून विशिष्ट समाजाला टार्गेट करण्यात आले. यात येथील घराची तोडफोड व धार्मिक स्थळांची विटंबना करण्यात आली. या घटनेचा




सर्व स्तरातुन निषेध केला जात आहे. या प्रकरणातील दोषी विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी दि.१९ जुलै २०२४ रोजी केज शहर बंद पाळण्यात आला. शहरातील व्यापार्यांनी आप आपले व्यवहार बंद ठेवले होते. दुपारी २ वाजता दर्गाह मैदान पासुन तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम पान २ वर...



## सिरसाळ्यात पावसाची सतत रिपरिप

चित्र : कापुस-सोयाबीन फवारणी खोळंबली

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या आठ दिवसांपासून जिल्ह्यात पावसाची सतत रिपरिप सुरु असल्याने कापुस,सोयाबीन पिकांची फवारणीची कामे खोळंबून गेली आहेत.यासह पिक अंतर्गत मशागतीची कामे देखील करता येत नाहीत. परळी तालुक्यातील सिरसाळा व परिसरात तर दररोज वरुन राजा बरसत आहे , पिक लागवड/पेरणी होऊन तब्बल एक महिणा झाला आहे,पावसा मुळे किडींचा प्रादुर्भाव पिकावर दिसून येतो आहे.यासाठी फवारणी आवश्यक आहे. रोज पाऊस असल्याने फवारणी करता येत नाही किंवा पावसाच्या वातावरणात पान २ वर...

## शिवणीत धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन!

भिक्खु धम्मशील थेरो : आषाढ पौर्णिमा वर्षावास प्रारंभ

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीडच्या वतीने महाविहार धम्मभूमी - डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, मौजे शिवणी, ता. जि. बीड येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी आषाढ पौर्णिमेच्या निमित्ताने धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याच पौर्णिमापासून वर्षावासाला प्रारंभ होतो, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्षावासाचा प्रारंभ होत असून याच काळात धम्म उपासक-उपासिका यांना यथायोग्य प्रकारे धम्माचरण करून पुण्य संपादित करता यावे, यासाठी सातत्यपूर्वक



सम्यक वाणीतून पूज्य भदंत यांच्या माध्यमातून उपासकांना धम्मदेसना दिली जाते. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमाप्रमाणे रविवार दिनांक २१ जुलै २०२४ रोजी आषाढ पौर्णिमाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सकाळी १० वाजता ऐतिहासिक बोधिवृक्षाची पूजा, १०ते १२ या वेळेत भोजनदान व खीरदान,१२ वाजता त्रिशरण-पंचशील- बुद्ध वंदना व १२:३० वाजता उपस्थित सर्व पूज्य भिक्खू संघाचे स्वागत व धम्मदेसना, पाहुण्यांचे सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.यावेळी प्रमुख धम्मदेसना पान २ वर...

## लाचेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता!

निर्णय : केज सत्र न्यायालयाने दिला निकाल

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज सुकळी येथील रामरतन गिरी यांनी वारसाचा फेर मंजुर करण्यासाठी साळेगावचे तलाठी आनिल कुलकर्णी व त्यांचे राईटर तुळशीराम मुकदम यांच्याशी संपर्क केला आसता त्यांनी पैसेची मागणी केली आसता दिनांक १६/३/२०१६ रोजी बीड येथील लाचलुचपत कार्यालयाशी संपर्क केला व तलाठी व त्यांचे राईटर वारसाचा फेर मंजुर करण्यासाठी २२०० रुपये मागत आसल्याची तक्रार दाखल केली आसता लाच लुचपत प्रतिबंध खात्याकडुन सापळा टाकण्यात आला आसता दिनांक १७/३/२०१६रोजी संबधीत तलाठी व राईटर यांनी लाचेची रक्कम मागितली व ती स्विकारली बाबत केज पोलीस स्टेशन येथे लाच लुचपत कायद्याअंतर्गत गु, र, नं, ७३/१६ या नुसार कलम ७, ८, १२, १३, १३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला त्यानंतर जिल्हा सत्र न्यायालय अंबाजोगाई येथे सदरील आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल करण्यात आले व २०२३ पान २ वर...

पत्रकार परिषद | सामाजिक कार्यकर्ते विजय चोरडियांची माहिती

## वणी मतदार संघातून लढविणार निवडणूक

यवतमाळ/पुण्यभूमी प्रतिनिधी

यवतमाळ जिल्हयातील तालुका वणी येथील सामाजिक कार्यकर्ते व दातृत्याचे धनी म्हणून ओळख असलेले सामाजिक कार्यकर्ते व भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विजय चोरडिया है आता विधानसभेच्या रिंगणात उतरण्यासाठी सज्ज झाले आहेत. गेल्या २० वर्षापासून राजकारण, समाजकारणात असून पक्षाने विश्वास टाकला तर निवडणुकीत उभे राहणार, अशी माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. शनिवारी दिनांक २० जुलै रोजी येथे त्यांनी श्री विनायक मंगल कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उमेदवारी दावेदारीबाबत पत्रकारांशी संवाद साधला.

वणी विधानसभा क्षेत्रात माझे अविरत



सामाजिक कार्य सुरु आहे. या माध्यमातून तिन्ही तालुक्यात क्षेत्रात दांडगा जनसंपर्क स्थापित झाला आहे. सर्व क्षेत्रातील उपक्रम व सर्व स्तरातील उपक्रम राबवत असल्याने आज सर्व जातीधर्म आणि सर्वच स्तरातील लोकांशी वैयक्तिक संबंध प्रस्तापित झाला आहे. यासह पक्षाचे विविध राजकीय उपक्रम सुरुच असतात. त्यामुळे सर्वसामान्यांचे एक नेतृत्व म्हणून वणी विधानसभा क्षेत्रात ओळख निर्माण झाली आहे, असेही ते म्हणाले.

### उमेदवारीसाठी दावा राहणार

पक्षात उमेदवारी मागण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मी गेल्या ३५ वर्षांपासून समाजकारणात असून गेल्या २० ते २५ वर्षापासून राजकारणात आहेत. माझे निस्वार्थ अविरत सामाजिक व राजकीय कार्य आहे. त्यामुळे पक्ष माझ्याबाबत नक्कीच विचार करेल, अशी मला आशा आहे.

## लिंगायत वाणी समाजाचे प्रश्न सोडविणार

डॉ.योगेश क्षीरसागर: ट्रस्टच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दि.२० : माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या पुढाकारातून काही वर्षांपूर्वी लिंगायत वाणी समाजासाठी दोन एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. त्या जागेवर स्मशानभूमीसह इतर सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्याठिकाणी दोन रूमसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यासह समाजाचे इतरही प्रश्न सोडविणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

शहरातील पेठ बीड भागातील बुरुड गल्ली येथे वीरशैव लिंगायत वाणी समाज ट्रस्टच्या नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा



डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१९) सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.पुढे बोलताना त्यांनी नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांना समाजकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, अध्यक्ष रामेश्वरआप्पा कानडे, उपाध्यक्ष अमर ढेपे, सचिव अशोकआप्पा चिपाडे, सहसचिव राहुल मिटकरी, कोशाध्यक्ष विलास बेदरकर, सदस्यपदी पशुपती शेटे, संजय घाळे, अनंत शहागडकर, सचिन रेगुडे, अमोल होणराव, बाळू स्वामी आदींचा निवडीबद्दल सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ नागरिक अनिलआप्पा मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, अशोक भुरे, नागेश मिटकरी, बाळू मिटकरी, शिवप्रकाश कानडे, रामलिंग साळप्पा, प्रभुलिंग शेटे, महादेव गाडवे, अर्जुन वडतीले, दत्ता परळकर, विद्याभूषण बेदरकर, शुभम कुलथे, अमोल वडतीले यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.